CMYK

आयपीएल सामना क्र.६९

मुंबई विरुद्ध हैद्राबाद

वेळ : दु.३.३० वा. स्थळ : वानखेडे, मुंबई

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

आयपीएल सामना क्र.७०

गुजरात विरुद्ध बेंगलोर

वेळ : रात्री.७.३० वा. स्थळ : चिन्नास्वामी, बेंगलोर



www.surajyadigital.com | रविवार, दि. २१ मे २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २३१ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# आज काँग्रेस नेत्यांची तोफ धडाडणार, पवारांच्या राष्ट्रवादीला हादरे बसणार ?

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर शहर-जिल्हा काँग्रेस समितीच्या वतीने रविवारी सोलापुरात काँग्रेस कार्यकर्त्यांचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे. काँग्रेस पक्षातील दिग्गज नेते उपस्थित राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने या मेळाव्याला मोठे महत्त्व आले असून हा मेळावा म्हणजे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांची लोकसभेची तयारी मानली जात आहे तसेच सोलापूरच्या जागेवर दावा सांगणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसला यातून सडेतोड उत्तर देण्यात येण्याची शक्यता वर्तवली गेलीय. या मेळाव्याच्या निमित्ताने काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे.**

## ▪ सोलापुरात आज कार्यकर्त्यांची मांदियाळी
## ▪ दिग्गज नेत्यांच्या उपस्थितीमुळे उत्साह संचारला



हुतात्मा स्मृती मंदिरात सकाळी साडे अकरा वाजता या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, अशोक चव्हाण आणि सुशीलकुमार शिंदे, बाळासाहेब थोरात, आमदार भाई जगताप, आमदार कुणाल राऊत हे उपस्थित राहणार आहे. पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघ व सोलापूर लोकसभा मतदारसंघात भाकरी फिरविण्याची वेळ आहे, अशी मागणी पंढरपुरातील एका कार्यक्रमात राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्याकडे करण्यात आली होती तसेच दोनदा झालेल्या पराभवाचे कारण पुढे करून सोलापूर लोकसभेवर राष्ट्रवादीने दावा सांगण्यास सुरुवात केली. त्यामुळे आता निवडणूक नाही लढवणार असे म्हणणारे सुशीलकुमार शिंदे हे पुन्हा एकदा मैदानात उतरण्यासाठी ॲक्टीव्ह झाल्याचे दिसत आहे. या मेळाव्यात सोलापूर लोकसभेच्या जागेवरून काँग्रेसचे नेते राष्ट्रवादीला सुनावणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मागील दोन लोकसभा निवडणुकीत सुशीलकुमार शिंदे यांचा पराभव झाला. त्यामुळे आगामी २०२४ ची निवडणूक लढणार नाही, असे शिंदे यांनी दोन-तीन वेळा जाहीरपणे सांगितले. दुसरीकडे आ. प्रणिती शिंदे



याही लोकसभेसाठी इच्छुक नाहीत,त्यांनी स्वतः सांगितले होते. शिंदे पिता- कन्या सोडल्यास काँग्रेसकडे लोकसभेचा तगडा उमेदवार नाही. नेमकी हीच संधी साधत राष्ट्रवादी काँग्रेसने सोलापूर लोकसभेवर दावा ठोकण्यास सुरुवात केली आहे. मध्यंतरी रोहित पवार यांनी सोलापूर लोकसभा राष्ट्रवादी लढवेल, असे सांगितले. त्यावर आ. प्रणिती शिंदे यांनी कोण रोहित पवार? असे म्हणून रोहित पवार यांची खिल्ली उडवली होती. त्यावर काँग्रेस-राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये चांगलेच शीतयुद्ध झाले होते. मात्र कालांतराने हे प्रकरण शांत झाले. मात्र मध्यंतरी खा. शरद पवार सोलापूर दौऱ्यावर आल्यावर पुन्हा या विषयाला सुरुवात झाली.

जरी पवारांनी सोलापूर लोकसभेचा निर्णय महाआघाडीच्या बैठकीत घेतला जाईल, असे सांगितले तरी दुसरीकडे मात्र माजी महापौर यु. एन. बेरिया, महेश कोठे आणि सुधीर खरटमल यांना मुंबईत बोलवून सोलापूर लोकसभेची चर्चा केली. त्यामुळे काँग्रेसने चांगली धास्ती घेतली आहे. गत लोकसभा निवडणुकीला काँग्रेसकडील शहर उत्तर तसेच पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादीकडे गेला आहे. आता सोलापूर लोकसभा मतदारसंघही गेल्यास काँग्रेसचे भविष्य अंधारमय होऊ शकते, अशी भावना काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांमध्ये आहे. त्यामुळेच निवडणूक लढणार नाही म्हणत सक्रिय राजकारणापासून दुरावलेले माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे पुन्हा ॲक्टिव्ह झाल्याचे पहायला मिळत आहे. नुकतेच कर्नाटकात झालेल्या निवडणुकीनंतर सुशीलकुमार शिंदे यांना निरीक्षक म्हणून पाठवण्यात आले होते.

### नाना पटालेंच्या भूमिकेकडे लक्ष

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आक्रमक आहेत. ते कायम स्वबळाची भाषा करत आहेत. मध्यंतरी तरी त्यांना एका प्रकरणावरून ठाकरे गटाचे संजय राऊत यांनाही चोंबडेपणा करू नका म्हणत टोला लगावला होता. आता राष्ट्रवादी सोलापूर लोकसभेवर दावा ठोकत आहेत, यावर नाना पटोले काय भूमिका घेतात याकडे काँग्रेस पदाधिकाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

भाजप सदस्यत्वाचा दिला राजीनामा

## प्रा. अशोक निंबर्गी काँग्रेसच्या वाटेवर ?

सुराज्य/सोलापूर

> मी भाजपच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. मात्र काँग्रेसमध्ये जाण्याचा निर्णय अद्याप घेतला नसल्याचे अशोक निंबर्गी यांनी सांगितले.

सोलापुरातील भारतीय जनता पार्टीमध्ये दोन आमदार देशमुखांमधील अंतर्गत वादाचा फटका आता पक्षाला बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. माजी शहराध्यक्ष प्रा. अशोक निंबर्गी यांनी भाजप सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. ते 'कमळ' सोडून आता काँग्रेसचा 'हात' हातात घेणार असल्याची चर्चा सुरू आहे. दरम्यान त्यांची मनधरणी करण्यासाठी भाजपचे काही नेते त्यांच्या निवासस्थानी बसून असल्याची माहिती मिळाली आहे.



प्रा. निंबर्गी हे पूर्वी माजी पालकमंत्री तथा विद्यमान आमदार विजयकुमार देशमुख यांचे समर्थक मानले जायचे. नंतर देशमुख यांच्याशी बिनसल्याने ते आमदार सुभाष देशमुख यांच्या गटात सामील झाले. तेव्हापासून आमदार विजयकुमार देशमुख यांच्या विरोधातील गट म्हणून अशोक निंबर्गी यांच्यासह इतर सहकाऱ्यांकडे पाहिले जायचे. मात्र त्यांनी आता गटबाजीला कंटाळून राजीनामा देत असल्याचे म्हटले आहे. रविवारी सोलापुरात काँग्रेस पक्षाच्यावतीने पक्षाचा मेळावा होत आहे त्या मेळाव्यात निंबर्गी हे काँग्रेस प्रवेश करतील, अशी चर्चा आहे.

## सराईत गुन्हेगार विष्णू कांबळे स्थानबद्ध

सुराज्य/सोलापूर

शहरातील फौजदार चावडी, विजापूर नाका आणि जोडभावी पेठ पोलीस ठाणे हद्दीतील १५ गंभीर गुन्हे दाखल असलेला सराईत गुन्हेगार विजय विष्णू कांबळे (वय-२२, रा.गंगानगर, हब्बू वस्ती) यास एमपीडीए अंतर्गत शनिवारी स्थानबद्ध करण्यात आले आहे.

विजय कांबळे हा मागील अनेक वर्षांपासून आर्थिक फायदा मिळवण्यासाठी विविध ठिकाणी दहशत निर्माण करत होता. २०२१ मध्ये त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. त्यानंतरही विजय कांबळे याच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही. त्याची येरवडा कारागृह येथे रवानगी करण्यात आली आहे.



ही कारवाई पोलीस उपायुक्त डॉ. दीपाली काळे, विजय कबाडे, सहायक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त डॉ. संतोष गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे, वपोनि उदयसिंह पाटील, पोनि भाऊराव बिराजदार, पोउपनि विर्शेद्रसिंग बायस व एमपीडीए पथकातील अंमलदार विनायक संगमवार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव, विशाल नवले यांनी केली. तसेच पोलीस आयुक्त डॉ.राजेंद्र माने यांनी कार्यभार स्वीकारल्यापासून एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्धतेची दहावी व या वर्षातील सहावी कार्यवाही आहे.

## अंजनगावात घरफोडी

**माढा** : तालुक्यातील अंजनगाव (खेलोबा) येथे राहणाऱ्या बाळू चिमाजी गडेकर यांच्या घरातून चोरट्याने १० हजार रुपये रोख आणि २२ ग्रॅम सोन्याचे दागिने असा एकूण ७५ हजाराचा ऐवज पळविला. ही चोरी शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली. गडेकर हे घराचा दरवाजा पुढे करून झोपी गेले होते. पहाटे चार वाजेच्या सुमारास चोरट्याने दरवाजा ढकलून घरात प्रवेश केला आणि ऐवज घेऊन पसार झाला. या घटनेची फिर्याद त्यांनी माढा पोलिसात दाखल केली. हवालदार दराडे पुढील तपास करीत आहेत.

## सासऱ्याचा अंत्यविधी करून परतणाऱ्या दोन सुना अपघातात ठार

सुराज्य/पंढरपूर

सासऱ्याचा अंत्यविधी करून घराकडे पायी परतणाऱ्या दोन सुनांना पाठीमागून ट्रकने जोरदार धडक दिल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला तर पाच जण जखमी झाल्याची घटना तालुक्यातील गुरसाळे येथे शुक्रवारी रात्री साडे अकराच्या सुमारास घडली.

या दुर्दैवी घटनेमध्ये हिराबाई भारत गुटाळ (वय ४५, रा. पुनर्वसन टाकळी) व मुक्ताबाई गोरख गुटाळा (वय ४०, रा. कुगाव ता. करमाळा) या दोन महिलांचा मृत्यू झाला. तर दत्तात्रय अजिनाथ सरडे, सुनिता महादेव गुटाळ, आनंदाबाई धनेश्वर साळुंखे (रा. चिकलठाणा, ता. करमाळा),




मयत मुक्ताबाई गुटाळ मयत हिराबाई गुटाळ

सुधामती साहेबराव धुमाळ (रा. सिद्धेश्वर निंबवडी, ता. बारामती) व अनिता ऊर्फ गीतांजली जयहिंद देवकर (रा. सुगाव, भोसे) हे जखमी झाले आहेत.

गुरसाळे येथील गेनदेव मनोहर गुटाळ यांचा मृत्यू झाल्यामुळे त्यांचा मुलगा, सून व इतर सर्व नातेवाईक अंत्यविधी करून घराकडे चालत निघाले होते. नातेवाईक गॅस गोडाऊनच्या समोर असताना पंढरपूरकडे जाणाऱ्या ट्रक क्रमांक टीएन ५२ एम ३५६४ च्या चालकाने पाठीमागून या घोळक्यामध्ये वाहन घातले. ट्रकने जोरदार धडक दिल्यामुळे हिराबाई गुटाळ यांचा जागीच मृत्यू झाला तर गंभीर जखमी झालेल्या मुक्ताबाई गुटाळ यांचा उपचार सुरू असताना मृत्यू झाला. तर इतर नातेवाईक देखील जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सदर अपघात प्रकरणी तामिळनाडू येथील गोविंदराज रंगास्वामी या चालकास अटक करण्यात आली असून पुढील तपास पोसई जाधव हे करीत आहेत.

## अवैद्य वाळू उपशावर कारवाई; ५७ लाखांचा मुद्देमाल जप्त

सुराज्य/सोलापूर

माळशिरस तालुक्यातील मौजे कदमवाडीमधील नांदवी ओढ्यातून अवैध वाळू उपशावर कारवाई करत स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दोन जेसीबी, दोन ट्रॅक्टरहेड, दोन डम्पिंग ट्रॉली वाळू चाळणी, दोन ब्रास वाळूसह एकूण ५७ लाख १६ हजार किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

जिल्ह्यातील अवैध धंद्यावर कारवाई करीत असताना पोलीस उपनिरीक्षक शैलेश खेडकर व त्यांच्या पथकाला मिळालेल्या माहितीवरून त्यांनी नांदवी ओढ्यातून शासनाची परवानगी व रॉयल्टी नसताना चोरून वाळू नेणाऱ्यांवर कारवाई केली. यावेळी पोलिसांनी एकूण चार इसमांना जागेवर पकडले, यावेळी दोन इसम पळून गेले. पकडलेल्या इसमांच्या



कब्जातून दोन जेसीबी, दोन ट्रॅक्टरहेड, दोन डम्पिंग ट्रॉली वाळू चाळणीसह, दोन्ही ट्रॉलीमध्ये प्रत्येकी एक ब्रास वाळू असे एकूण ५७ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. एकूण सात आरोपींवर नातेपुते पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांचे नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक शैलेश खेडकर, पोलीस अंमलदार धनाजी गाडे, आसिफ शेख, धनराज गायकवाड, अक्षय दळवी, अक्षय डोंगरे, चालक समीर शेख यांनी बजावली.

### चारजण ताब्यात तर दोघांचा शोध सुरू

याप्रकरणी पोलिसांनी ज्ञानेश्वर उर्फ माऊली उद्धव कदम (वय-२७,रा.कदमवाडी, ता. माळशिरस), संतोष धोंडीराम निकम (वय-३०, रा. कदमवाडी), पप्पू सुदाम लांडगे (वय-२६, रा.फोंडशिरस, माळशिरस), गणेश सर्जेराव मारकड (वय-२३, रा. मारकडवाडी,ता.माळशिरस) यांना ताब्यात घेण्यात आले आहे तर माऊली नामदेव कदम (रा. कदमवाडी), गोट्या शिवाजी इंगळे (रा.कदमवाडी), प्रकाश भानुदास कदम (रा. कदमवाडी) यांचा शोध सुरू आहे.

## विजापूर रोडवर पहाटे अपघात; तरुण जागीच ठार

**सोलापूर** : अनोळखी वाहनाच्या धडकेने पादचारी तरुण गंभीर जखमी होऊन जागीच मरण पावला. हा अपघात विजापूर रोडवरील बाकळे कलेक्शन जवळ शनिवारी पहाटेच्या सुमारास घडला.

राहुल दिलीप राठोड (वय२६ रा. नेहरूनगर, विजापूर रोड) असे मयताचे नाव आहे. पहाटे अडीच वाजेच्या सुमारास विजापूर रोडवरील बाकडे कलेक्शन जवळ तो अनोळखी वाहनाच्या अपघातात गंभीर जखमी आढळला होता. त्याला पोलिसांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. मयत राहुल राठोड हा अविवाहित असून तो बाकळे कलेक्शन येथे कामाला होता. त्याच्या पश्चात आई, एक भाऊ आणि एक बहीण असा परिवार आहे. या अपघाताची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून हवालदार म्हेत्रे पुढील तपास करीत आहेत.

## शेटफळमध्ये रोख रकमेसह साडेपाच लाखांचे दागिने पळविले

सुराज्य/करमाळा


घराच्या दुसऱ्या मजल्यावरील उघड्या दरवाजातून प्रवेश करून चोरट्याने कपाटातील रोख रकमेसह ५ लाख ६० हजार रुपये किमतीचे दागिने पळविले. ही धाडसी चोरी शेटफळ (ता. करमाळा) येथे शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली.

शेटफळ (ता.करमाळा) येथे प्रतापसिंह विष्णुदास लबडे हे राहण्यास आहेत.गुरुवारी रात्रीच्या सुमारास घरातील मंडळी जेवण करून झोपले होते मध्यरात्रीनंतर चोरट्याने शेजारच्या घरावरून त्यांच्या दुसऱ्या मजल्यावर प्रवेश केला. त्यानंतर उघड्या दरवाजातून घरात प्रवेश केला. आणि तळमजल्यावरील बेडरूम मधील कपाट उचकटून त्यातील ७० हजार रुपये रोख आणि ११२ ग्रॅम सोन्याचे दागिने असा ऐवज चोरून पसार झाला. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर प्रतापसिंग लबडे यांनी या घरफोडीची फिर्याद करमाळा पोलिसात दाखल केली. पोलिसांनी अनोळखी चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला. सहाय्यक निरीक्षक बंडगर पुढील तपास करीत आहेत.



## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



उकाड्याने पुरता हैराण झालोय, विचार करतोय थंड हवेच्या ठिकाणी जाऊन यावं !

कल्याण
149-45-456

### पोलीस कोठडीत आरोपी मृत्यू प्रकरण

# निरीक्षकासह सात पोलिसांचा जामीन फेटाळला

सुराज्य/सोलापूर

पोलिसांच्या ताब्यात असताना एका संशयित आरोपीच्या मृत्युप्रकरणी दाखल गुन्ह्यात विजापूर नाका पोलीस ठाण्याचे तत्कालीन निरीक्षकासह सात कर्मचाऱ्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज जिल्हा सत्र न्यायाधीश आर. एन. पांढरे यांनी फेटाळून लावला. दरम्यान, पुण्याचे सीआयडीचे पथक या पोलिसांना ताब्यात घेण्यासाठी सोलापुरात येऊन हात हलवत परतले आहे.

पोलीस निरीक्षक उदयसिंह श्यामराव पाटील, सहायक पोलीस निरीक्षक शीतलकुमार मारुती कोल्हाळ, श्रीरंग तुकाराम खांडेकर, शिवानंद दत्तात्रय भिमदे, अंबादास बालाजी गड्डम, आतिश काकासाहेब पाटील, लक्ष्मण पोमू राठोड अशी अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे आहेत. विजापूर नाका पोलीस ठाणे येथे घरफोडीतील आरोपी भीमा रज्जा काळे (वय ४२, रा. भांबुरे वस्ती, कुर्डूवाडी, ता. माढा) यास जिल्हा कारागृह येथून सपोनि कोल्हाळ यांनी वर्ग करून ताब्यात घेतले. आणि न्यायालयाकडून त्याची तीन दिवसांची पोलीस कोठडी मंजूर करून घेतली होती. पोलीस कोठडीत असताना आरोपीस सर्दी, ताप, खोकला व उलट्या होत असल्याने तसेच त्याचे दोन्ही पाय सुजल्याने त्याला उपचाराकरिता सिव्हिल हॉस्पिटल येथे दि.२४ सप्टेंबर २०२१ रोजी दाखल केले होते. मात्र दि.३ ऑक्टोबर २०२१ रोजी तो मयत झाला होता.



याप्रकरणी गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस उपअधीक्षक श्रीशैल सिद्रामप्पा गजा यांनी विजापूर नाका पोलीस ठाणे येथे वरील पोलीस कर्मचाऱ्याविरुद्ध (भादवि कलम ३०४, ३३०, १६६ आणि ३४ प्रमाणे) गुन्हा दाखल नोंदविला होता. अटक टाळण्यासाठी सर्व आरोपींनी न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर त्याला त्रास होत होता. मात्र पोलिसांनी त्याला उपचारासाठी रुग्णालयात नेले नाही. तपासादरम्यान आरोपीला लॉकअपमध्ये ठेवणे आवश्यक होते. मात्र त्याला गुन्हे प्रकटीकरण कक्षात ठेवण्यात आले. यासंदर्भाच्या नोंदी पोलिसांनी केस डायरीमध्ये घेतले नाही. तसेच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे तंतोतत पालन केले नाही. आरोपीला अटक केल्यानंतर त्याच्या अंगावर जखमा नव्हत्या परंतू पोलीस कोठडीत घेतल्यानंतर तो लंगडत होता. त्याकडे पोलीस अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले. मयत भीमा काळे याच्या मृत्यूस आरोपी हे कारणीभूत आणि अपराधी असल्याचे प्राथमिकदृष्ट्या दिसून येते. त्यामुळे त्यांना जामीन देता येत नाही असा युक्तिवाद सरकार पक्षाच्यावतीने मांडण्यात आला होता. तो ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर केला. या प्रकरणात सरकारतर्फे जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग राजपूत, ॲड. अल्पना कुलकर्णी यांनी तर आरोपींतर्फे ॲड. शशी कुलकर्णी आणि ॲड. एस.ए. बागवान यांनी काम पाहिले.

CMYK

# धोनीच्या चेन्नईची प्लेऑफमध्ये धडक

## दिल्लीचा शेवट पराभवाने, चेन्नईचा ७७ धावांनी विराट विजय

*दिल्लाचा पराभव करत धोनीच्या चेन्नईने प्लेऑफमध्ये प्रवेश केलाय. चेन्नईने १४ सामन्यात १% गुणांची कमाई केली आहे. चेन्नईला आठ सामन्यात विजय मिळालाय. तर एक सामना पावसामुळे रद्द झाला होता. प्लेऑफमध्ये क्वालिफाय करणारा चेन्नई दुसरा संघ आहे. याआधी गुजरातने प्लेऑफमध्ये प्रवेश केला होता. चेन्नई सध्या दुसऱ्या क्रमांकावर विराजमान आहे. पण लखनौ आणि कोलकाता यांच्यातील सामन्यावर चेन्नईने दुसरे स्थान अवलंबून आहे. लखनौने कोलकात्याचा विराट पराभव केल्यास चेन्नई तिसऱ्या क्रमांकावर घसरु शकतो. लखनौने कोलकात्याचा पराभव केल्यास.. चेन्नई आणि लखनौ यांच्यात समान गुण होतील.. अशात नेट रनरेटच्या आधावर क्वालिफायर एक मध्ये प्रवेश मिळेल. लखनौला दुसऱ्या क्रमांकावर झेप घेण्यासाठी कोलकात्याचा ९% धावांनी पराभव करावा लागेल.*


ऋतुराज गायकवाड

चेन्नईचा प्लेऑफमध्ये प्रवेश

दिल्लाचा पराभव करत धोनीच्या चेन्नईने प्लेऑफमध्ये प्रवेश केलाय. चेन्नईने १४ सामन्यात १% गुणांची कमाई केली आहे. चेन्नईला आठ सामन्यात विजय मिळालाय. तर एक सामना पावसामुळे रद्द झाला होता. प्लेऑफमध्ये क्वालिफाय करणारा चेन्नई दुसरा संघ आहे. याआधी गुजरातने प्लेऑफमध्ये प्रवेश केला होता. चेन्नई सध्या दुसऱ्या क्रमांकावर विराजमान आहे. पण लखनौ आणि कोलकाता यांच्यातील सामन्यावर चेन्नईने दुसरे स्थान अवलंबून आहे. लखनौने कोलकात्याचा विराट पराभव केल्यास चेन्नई तिसऱ्या क्रमांकावर घसरु शकतो.. अशात लखनौ आणि कोलकाता यांच्यामध्ये क्वालिफायर एक सामना होईल. लखनौने कोलकात्याचा पराभव केल्यास.. चेन्नई आणि लखनौ यांच्यात समान गुण होतील.. अशात नेट रनरेटच्या आधावर क्वालिफायर एक मध्ये प्रवेश मिळेल.

दिल्लीचा दारुण पराभव

चेन्नईने दिलेल्या २२४ धावांच्या विराट आव्हानाचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात निराशाजनक झाली. पृथ्वी शॉ स्वस्तात तंबूत परतला. पृथ्वी शॉ याने फक्त पाच धावांचे योगदान दिले. पृथ्वी शॉ बाद झाल्यानंतर साल्ट आणि रुसोही लगेच तंबूत परतले. दीपक चाहर याने या दोघांना एकापाठोपाठ एक तंबूत धाडले. एका बाजूला विकेट पडत असताना कर्णधार डेविड वॉर्नर याने एक बाजू लावून धरली होती. वॉर्नर याने ८६ धावांची एकाकी झुंज दिली. साल्ट ३, रुसो ० धावांवर बाद झाले. यश धुल १३ आणि अक्षर पटेल याने १५ धावांचे योगदान दिले. अमन खान सात तर ललीत यादव सहा धावांवर बाद झाले. कुलदीप यादव शून्यावर बाद झाला. डेविड वॉर्नरचा अपवाद वगळता एकाही फलंदाजाला ३० धावांपर्यंत मजल मारता आली नाही.

डेविड वॉर्नर याने एकाकी झुंज दिली. वॉर्नर याने ५८ चेंडूत ८६ धावांची खेळी केली. या खेळीत वॉर्नर याने पाच षटकार आणि सात चौकार लावले. पथिराणा याने वॉर्नरची खेळी संपुष्टात आणली. वॉर्नर याने एका बाजूने दिल्लीचा डाव सावरला. चेन्नईकडून दीपक चहर सर्वात यशस्वी गोलंदाज ठरलाय. दीपक चाहर याने सर्वाधिक तीन विकेट घेतल्या. महिश तिक्षणा आणि पथिराणा यांनी प्रत्येकी दोन दोन विकेट घेतल्या. तुषार देशपांडे आणि रविंद्र जाडेजा यांनी प्रत्येकी एक एक विकेट घेतली.



# शंभर वर्षाच्या आजीला मिळाला उत्पन्नाचा दाखला

## लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद; प्रशासन समाधानी

सुराज्य/सोलापूर



नागरिकांना एका तासात दाखला त्यांच्या हातात मिळावा या दृष्टीने दहा दिवस सोलापूर शहरात महाशिबिर भरवण्याचे ठरले. नार्थकोट प्रशालेची निवड करण्यात आली रात्री नऊ वाजता अप्पर जिल्हाधिकारी ठोंबरे यांनी जागेची पाहणी केली आणि जागा निश्चित केली. या शिबिरामध्ये शंभर वर्षाच्या आजीला मिळाला उत्पन्नाचा दाखला मिळाला.

काही दिवसात दहावी बारावीचा निकाल लागणार त्यानंतर पालकांची आपल्या मुलांचे दाखले काढण्यासाठी सेतू परिसरात मोठी गर्दी होणार परंतु सोलापुरातील मक्ता संपल्याने सेतू कार्यालय प्रशासनाने बंद केलेले. दुसरीकडे उत्तर तहसील कार्यालयामध्ये मानधन वाढल्याने निराधार लाभार्थ्यांना २१००० रुपयाचा दाखला देणे बंधनकारक करण्यात आल्याने तिथेही गर्दी उसळलेली. अशातच शहरातील महा-ई-सेवा केंद्रातून दाखले वेळेवर मिळत नाहीत, सर्वसामान्य नागरिकांची लूट होत आहे अशा तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आणि सेतू कार्यालय लवकरात लवकर सुरू करावे ही मागणी वाढली.

अशी एकूणच परिस्थिती पाहता राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी तातडीने निवासी जिल्हाधिकारी शमा पवार, उपविभागीय अधिकारी क्रमांक एक विठ्ठल उदमले, उत्तर सोलापूरचे तहसीलदार सैफन नदाफ यांची बैठक घेऊन तातडीने नियोजन केले. नागरिकांना एका तासात दाखला त्यांच्या हातात मिळावा या दृष्टीने दहा दिवस सोलापूर शहरात महाशिबिर भरवण्याचे ठरले.

एका दिवसात दाख़ला निर्गमित करण्यासाठी बारा काउंटर लावण्यात आले. सदर बारा काउंटरवर महा-ई-सेवा केंद्रांचे ऑपरेटर्सची नियुक्ती करण्यात आली. त्याचबरोबर उत्तर सोलापूर तहसील कार्यालयातील चार नायब तहसीलदार, चार अव्वलकारकून, पाच सर्कल ऑफ़िसर, पाच लिपिक, सहा तलाठी, दहा कोतवाल व चार ऑपरेटर अशी अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून आठवडाभर मध्यवर्ती ठिकाणी हा सर्व सेटअप कार्यरत ठेवण्यात आला.

# लोकन्यायालयापुढे झालेले वाटपपत्र नोंदणीकृत करण्याची गरज नाही : मुंबई उच्च न्यायालय

## राज्यातील शेतकरी कुटुंबासाठी महत्वपूर्ण निर्णय

सुराज्य/बार्शी

**शेतजमिनीचे विभाजन परिणामकारकरित्या अंमलात आणण्यासाठी समझोता हा सक्तीने नोंदणीकृत करण्याची आवश्यकता नाही आणि सदर मालमत्तेच्या मुल्यांकावर मुद्रांक शुल्काचा भरणा देखील करावा लागणार नाही असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एस.व्ही.गंगापूरवाला व न्यायमूर्ती एस.व्ही.मारणे यांनी दिला आहे.**

राज्यातील अनेक शेतकरी कुटुंबाकरिता अतिशय महत्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला असून बार्शी वकिल संघटनेच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी निर्गमित केलेल्या परिपत्रकास आव्हान देणारी याचिका बार्शी वकिल संघटनेच्या वतीने १६ नोव्हेंबर २०१६ रोजी दाखल करण्यात आली होती.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निबंधक सोलापूर यांनी यांनी निर्गमित केलेल्या परिपत्रकाअंतर्गत असे निर्देश दिले होते की, उपवभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांनी नोंदणीकृत नसलेल्या कागदपत्रांच्या आधारे महसूल अभिलेखात फेरफार करु नये.

यावर युक्तीवाद असा करण्यात आला की, न्यायालयांनी किंवा लोकअदालतीमध्ये शेतजमिनीबाबत पारित केलेला समझोता हुकुमनामा हा नोंदणी कायद्याच्या तरतूदींनुसार सक्तीने नोंदणीकृत करण्याची आवश्यकता नाही मुंद्राक अधिनियमानुसार जर दस्तऐवज हे शेतजमिनीच्या विभाजनाशी संबंधीत असेल तर लागू असलेल्या शुल्काचा दर केवळ १०० रुपये आहे.



मुंबई उच्च न्यायालयाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निबंधक सोलापूर यांचेवर ताशेरे ओढून म्हटले आहे की,न्यायालयांनी किंवा लोकअदालतीद्वारे विभाजन आणि स्वतंत्र ताब्यासाठीच्या दाव्यामध्ये पारित केलेला समझोता हुकूमनामा हा नोंदणी कायद्याच्या तरतूदींनुसार सक्तीने नोंदणी करण्याचा दस्तऐवज नाही. मालमत्तेच्या संदर्भातील शेतविषयकचा समझोता हुकूमनामा जो या दाव्याचा विषयवस्तू आहे ते नोंदणी कायदा १९०८ च्या कायद्याच्या तरतूदीअंतर्गत सक्तीने नोंदणीकृत करणे आवश्यक नाही आणि अशा दस्तऐवजावरील निवाड्याद्वारे मुद्रांक शुल्क १०० रुपयांपेक्षा अधिक नसेल.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ४६ मधील तरतूदीत असे म्हटले आहे की,जेथे विभाजन लागू करण्याचा अंतिम आदेश कोणत्याही महसूल प्राधिकरणाने किंवा कोणत्याही दिवाणी न्यायालयाद्वारे किंवा एखाद्या लवादाच्या निवाड्याद्वारे विभाजन करण्याचे निर्देश पारित केले असतील तर एखादे दस्तऐवज किंवा विभाजन आवश्यक मुद्रांकाने मुद्रांकित केले जाईल आणि अशा आदेशान्वये किंवा निवाड्याद्वारे विभाजनाचा दस्तऐवज त्यापाठोपाठ निष्पादित केला जातो अशा दस्तऐवजावरील शुल्क हे १०० रुपयांपेक्षा जास्त नसावे.

शेतजमिनीचे विभाजन परिणामकारकरित्या अंमलात आणण्यासाठी समझोता हा सक्तीने नोंदणीकृत करण्याची आवश्यकता नाही आणि सदर मालमत्तेच्या मुद्रांकनावर मुद्रांक शुल्काचा भरणा देखील करावा लागणार नाही परंतु महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम,१९५८ च्या कायद्याच्या कलम ४६ च्या परंतु (ब),आणि(क)द्वारे याचे नियमन केले जाईल असे मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालपत्रात म्हटले आहे.

मुंबई उच्च न्यायालयातील ॲड.वैभव उगले,ॲड.सुजित बुगडे, ॲड.विकास सोमवंशी,ॲड.रोशन चव्हाण,ॲड.भाग्यश्री माघडे,ॲड.शुभम वसेकर यांनी याचिकेचे काम पाहिले.

# हत्ती तलाव पुलाच्या नूतनीकरणाचे काम सुरू

सुराज्य/अक्कलकोट

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या मार्गावरील न.प.च्या धर्मशाळेलगत हत्ती तलावाचे सांडपाणी वाहणाऱ्या संस्थानकालीन पुलाच्या नूतनीकरणाचे काम अखेर नगरपरिषदेने हाती घेतले असून हे काम ४५ दिवस चालणार असल्याची माहिती बांधकाम विभागाने दिली आहे.



संस्थानकालीन हत्ती तलाव भरल्यानंतर ओव्हरफ्लो होणाऱ्या पाण्याच्या सांडव्याकरिता सदरचा पुल उपयोगात यायचा. याकरिता सदरचे काम नव्याने करण्याकरिता नाला सरळीकरण अंतर्गत महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाकडून हाती घेण्यात आलेले होते. गेल्या अनेक वर्षापासून सदरचे काम ठेकेदाराकडून अर्धवट स्थितीत ठेवल्याने त्यामुळे पाण्याचा प्रवाह पुढे न जाता तेथेच थांबत असल्याने दुर्गंधी पसरुन परिसरातील रहिवाशांसह स्वामी भक्तांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. वाहतुकीची देखील कोंडी होत होती. अखेर नगरपरिषदेने याची दखल घेवून अण्णासाहेब साठे या योजने अंतर्गत रु.२६ लाख खर्चाच्या पुलाच्या कामास सुरुवात करण्यात आलेली आहे.

श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी व महाप्रसादासाठी वाढती गर्दी पाहता नगरपरिषद प्रशासनाने शहरवासियांसह स्वामी भक्तांना पर्यायी मार्ग म्हणून सोलापूर रोड बायपास व माणिक पेठ येथे मार्गक्रमण करण्याची सूचविण्यात आलेले आहे. मात्र माणिक पेठ येथील रस्ता अरुंद व अडचणीचा असून तो मार्ग मोकळा करणेकामी नगरपरिषदेने तातडीने पावले उचलून हा रस्ता मोकळा करुन देण्याची मागणी पुढे येत आहे.

सदरच्या रस्त्यावरील वर्दळ पाहता नगरपरिषद प्रशासनाने संबंधित ठेकेदाराच्या माध्यमातून अत्यावश्यक सेवा म्हणून सदरील काम संथगतीने न होता मुंबई-पुणेच्या धरतीवर रात्रंदिवस काम करुन अवघ्या चार दिवसात काम संपविण्याची मागणी स्वामी भक्त व अक्कलकोट शहरवासियांतून होत आहे.

सध्याच्या घडीला उन्हाळ्याची सुट्टी सरत असताना श्रींच्या दर्शनासाठी वाढत चाललेली गर्दी पाहता यासह दि.३ जुलै गुरुपौर्णिमा असून यानिमित्त होणारी श्रीक्षेत्र अक्कलकोटमध्ये प्रचंड गर्दीची प्रमाण पाहता सदरचे काम जलदगतीने होणे गरजेचे आहे. तरी नगरपरिषदेने मुंबई-पुणेच्या धरतीवर सदरचे काम रात्रंदिवस जलदगतीने करावे अन्यथा स्वामी भक्त व शहरवासियांच्या रोषाला सामोरे जावे लागणार आहे.

जुन्या काळातील नगरपरिषद पदाधिकाऱ्यांनी भविष्यातील वाढती गर्दी पाहता त्याकाळात धर्मशाळा अद्यावत बांधकाम करण्यात आलेले होते. मात्र याकडे गेल्या अनेक वर्षापासून नगरपरिषदेने दुर्लक्ष केल्याने धर्मशाळा नव्हे तर कोंडवाडा झाला असून हजारो स्क्वेअरफुटची जागा नगरपरिषदेची विकासाविना पडीक पाडलेली आहे. याबाबत देखील नगरपरिषद प्रशासनाने त्वरीत लक्ष घालण्याची मागणी पुढे येत आहे.

# दुधनी येथे पाणी उडाल्याच्या कारणावरून मारहाण महिलेसह तिघे जखमी

सुराज्य/सोलापूर

भरलेल्या टाकीतील पाणी अंगावर उडाल्याच्या कारणावरून दगड, काठी आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत एका महिलेसह तिघेजण जखमी झाले . ही घटना दुधनी (ता. अक्कलकोट) येथे शनिवारी सकाळच्या सुमारास घडली.

अनिल शंकर शिंगे (वय २३) त्याचा भाऊ धर्मेंद्र शिंगे (वय ३०) आणि महादेवी शंकर शिंगे ( वय ४० सर्व रा.दुधनी) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. शिंगे यांच्या घराच्या छतावर असलेली पाण्याची टाकी भरून ते पाणी खाली सांडत होते . त्या कारणावरून झालेल्या भांडणात त्यांना नागप्पा भीमसेन शिव्नुर, इंदुबाई शिव्नुर आणि इतर १० ते १५ लोकांनी मिळून त्यांना मारहाण केली. तर दुसऱ्या गटातील प्रज्वल शिवपुत्र हडागिल (वय २३ रा.कलबुर्गी) हा देखील जखमी झाला. त्याला धर्मा शिंगे, सुनील शिंगे आणि अन्य दोघांनी काठी आणि लाथा बुक्क्याक्याने मारहाण केली. त्याला देखील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

**भाजल्याने महिला जखमी**

अंगणातील कचरा झाडून पेटविल्यानंतर पाठीमागून शेळी दुसणी मारल्याने आगीत पाय पडून महिला भाजून जखमी झाली. कौशल्या मल्हारी शिंगाडे (वय ६० रा. महाराणा प्रताप झोपडपट्टी, विजापूर रोड) असे जखमींचे नाव आहे. आज शनिवारी सकाळी त्या घरासमोरील अंगण झाडून कचऱ्याला आग लागली होती. त्यावेळी अचानक पाठीमागून शेळी धडकल्याने त्यांच्या पाय आगीत पडल्याने त्या भाजल्या . त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले . विजापूर नाका पोलिसात याची नोंद झाली आहे .

**आई रागावल्याने विष प्राशन**

शहरातील नीलमनगर येथे आई रागावल्याच्या कारणावरून साक्षी बबन जाधव (वय १९) या तरुणीने विषारी द्रव प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केली . ही घटना शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. तिला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले . एमआयडीसी पोलिसात याची नोंद झाली आहे .

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

माळशिरस तालुक्यात भाजपाला धक्का

# दसूरच्या सरपंच वंदना कागदे यांचा राष्ट्रवादीमध्ये प्रवेश

सुराज्य/वेळापूर



माळशिरस तालुक्यातील भाजपाचे दसुर गावचे विद्यमान सरपंच सौ वंदना हनुमंत कागदे यांनी वेळापूर गरुड बंगला येथे जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी दसुर ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य मंगल दादासो सावंत , अनिता सुभाष सावंत,नंदा संभाजी काळे यावेळी उपस्थित होत्या. विद्यमान सरपंच वंदना हनुमंत कागदे यांनी भाजपातून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने माळशिरस तालुक्यात भाजप मोहिते पाटील गटाला धक्का बसला आहे.

यावेळी वेळापूर ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच विमलताई उत्तमराव जानकर व विद्यमान सदस्य डॉ. स्नेहलताई जीवन जानकर यांच्या हस्ते दसूर सरपंच वंदना कागदे यांच्या गळयात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपरणे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते तथा अकलूज मार्केट कमिटीचे नूतन संचालक उत्तमराव जानकर, धानोरे गावचे माजी सरपंच जीवन जानकर ,अकलूज मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजीकाका चव्हाण, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, अमोल पनासे, तानाजी कागदे ,दसुर माजी सरपंच दादासाहेब सावंत, ज्येष्ठ नेते हनुमंत कागदे ,दादासाहेब सावंत, सुभाष सावंत, अक्षय खपाले, समाधान खपाले, मधुकर सावंत, शिवाजी सावंत, गौतम निकम, नामदेव सावंत यांच्यासह या गटाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने वेळापूर गरुड बंगला येथे उपस्थित होते. सरपंच वंदना कागदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने दसुर येथील ग्रामपंचायत गटनेते व उपसरपंच धनाजी सावंत यांना धक्का बसला आहे. दोन वर्षांपूर्वी दसुर ग्रामपंचायतची निवडणूक झाली होती. यामध्ये धनाजी सावंत गटाचे सहा उमेदवार निवडून आले होते तर उत्तमराव जानकर गटाचे तीन उमेदवार निवडून आले होते तर सरपंचपद हे ओपन महिला होते. ओपन महिला सरपंच पदी धनाजी सावंत यांच्या पार्टीतून वंदना कागदे यांची सरपंच पदी तर उपसरपंचपदी धनाजी सावंत यांची निवड झाली होती. पण त्यानंतर दोन वर्षानंतर जानकर गटातील धनाजी सावंत यांची भावजय मंगल शिवाजी सावंत यांनी सदस्य पदाचा राजीनामा दिला होता. त्या ठिकाणी नुकतीच वार्ड क्रमांक एक मध्ये एका जागेसाठी निवडणूक लागली होती. यामध्ये रूपाली धनाजी सावंत विरुद्ध श्रीनाथ पॅनल जानकर गटाच्या मंगल दादासो सावंत यांच्यामध्ये अटीतटीची लढत होऊन यामध्ये मंगल सावंत या विजयी होऊन जानकर गटाने जागा राखली आहे. त्या सत्कारासाठी २० मे रोजी शनिवारी दुपारी गरुड बंगला वेळापूर येथे आल्या असता याचवेळी दसुर ग्रामपंचायतच्या विद्यमान सरपंच वंदना हनुमंत कागदे याही गरुड बंगला येथे येऊन त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.

# जि. प. शिक्षकांच्या बदल्यांची, पदोन्नतीची प्रक्रिया पुढे ढकलली

## सहा शिक्षकांची जन्मतारीख सारखी असल्याने मोठा पेच

सुराज्य/सोलापूर

पदोन्नती ही सेवा ज्येष्ठता यादीनुसार देण्यात येण्याचे ठरले. या यादीत सहा शिक्षकांची जन्मतारीख व नियुक्ती तारीखही सारखीच असल्याने पेच निर्माण झाला आहे. तसेच काही शिक्षक हे सेवा ज्येष्ठता यादीवर समाधानी नसल्याने पदोन्नतीची प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली.

मागील काही दिवसांपासून शिक्षकांना पदोन्नती द्यावी, अशी मागणी शिक्षक संघटनांकडून केली जात होती. त्यानुसार गटशिक्षणाधिकारी यांच्याकडून यादी मागविण्यात आली होती. या सर्व याद्या एकत्रित करून सेवा ज्येष्ठता यादी तयार करण्यात आली. गुरुवार १८ मे रोजी समुपदेशन घेण्याचे ठरले. पदोन्नतीसाठी पात्र असलेले शिक्षक समुपदेशनासाठी आले होते. शिक्षक संघटनांनी यादीवर आक्षेप घेतल्याने ठरलेली समुपदेशनाची प्रक्रिया थांबविण्यात आली. मुख्याध्यापक होण्यासाठी जमलेल्या ६०४ शिक्षकांची निराशा झाली. विस्तार अधिकारी पदोन्नतीची प्रक्रिया सुरू असताना यादीवर संबंधित शिक्षकांची सही असल्याशिवाय पदोन्नती देता येत नाही, असे सांगून नाकारली. याचे खापर संघटनांवर का फोडता, असा सवाल करण्यात आला.

### यादीतील त्रुटी दूर करणार : जावीर

शिक्षकांना पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सेवा ज्येष्ठता यादीतील त्रुटी दूर करण्यात येणार आहेत. त्यावर शिक्षकांची हरकत नसल्याची सही घेण्यात येणार आहे. त्यानंतर तालुका स्तरावर ऑनलाइन पद्धतीने समुपदेशन घेण्यात येईल. सीईओ दिलीप स्वामी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल, असे शिक्षणाधिकारी संजय जावीर यांनी सांगितले.

# जांबमुनी मोची समाजसेवा मंडळातर्फे सामुदायिक विवाह सोहळा

सुराज्य/सोलापूर

श्री जाम मुनी मोची समाजसेवा मंडळ लष्कर येथील सालाबादप्रमाणे यंदाच्या वर्षी सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २१ मे २०२३ रोजी दुपारी साडेबारा वाजता बापूजी नगर येथे हा विवाह सोहळा संपन्न होणार आहे, अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली .

समाजातील कष्टकरी लोकांना आजच्या काळात कुटुंबातील सर्वांचे पालन पोषण करणे कठीण झालेले आहे. अशा परिस्थितीत व्याजाने कर्ज काढून लग्न करणे व त्या जोडप्यांना आयुष्यभर सावकारांचे कर्ज फेडावे लागते. अशा कठीण परिस्थिती समाजाला न्याय देणे म्हणून या सर्व गोष्टींचा निस्वार्थपणे विचार करून बुद्धिजीवी पंचमंडळी कार्यकर्ते एकत्र येऊन या सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करीत आहेत. समाजातील दानशूर व्यक्तीकडून व समाज कार्यकर्ते एकत्रित वर्गणी व देणगी रूपाने रक्कम गोळा करून हा सोहळा पार पाडण्यात येतो. २८ वर्षापासून अखंडपणे हा सामुदायिक विवाह सोहळा सुरू आहे

यंदाचे हे २९ वे वर्ष आहे आहे. सामुदायिक विवाह सोहळ्यास माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, आमदार प्रणिती शिंदे, खासदार जयसिद्धेश्वर महास्वामी, सुभाष देशमुख, विजयकुमार देशमुख, शिवाजी सावंत आदींची उपस्थिती यावेळी लाभणार आहे.

# तीन ढाब्यांवर धाडी; चालकांसह सात मद्यपी ग्राहकांवर गुन्हे दाखल

राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

सुराज्य/सोलापूर



हॉटेल ढाब्यांवर बसून दारु पिणा-यांवर विरुद्ध राज्य उत्पादन शुल्क विभागाचे धाडसत्र सुरुच असून शुक्रवारी १९ रात्रीच्या सुमारास एकूण ३ ठिकाणी ढाब्यांवर धाडी टाकून ३ ढाबा चालकांसह त्या ठिकाणी दारु पिताना आढळलेल्या ७ मद्यपी ग्राहकांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

याप्रकरणी एका दिवसात गुन्ह्याचे आरोपपत्र न्यायालयात दाखल केले असता दारुबंदी न्यायालयाचे न्यायदंडाधिकारी नम्रता बिराजदार यांनी ढाबाचालकाला प्रत्येकी २५ हजार व मद्यपी ग्राहकांना प्रत्येकी ४ हजार असे एकूण एक लाख तीन हजारांचा दंड ठोठावला आहे. सोलापूर- विजापूर रोडवरील नांदणी येथील ढाब्यावर धाड टाकून हॉटेल चालक महासिद्ध रायगोंडा बिराजदार ( वय ३४) याच्यासह २ मद्यपी ग्राहक संदीप प्रकाश सलगर व श्रीकांत बाळासाहेब भूमकर यांना अटक केली. सोलापूर-बार्शी रोडवरील भोगाव परिसरातील हॉटेलवर धाड टाकून हॉटेल चालक योगेश हनमंत घोडके (वय २९) व ग्राहक सुशील हरिदास गवळी, ज्ञानेश्वर विलास ताकमोगे अशा २ मद्यपींना अटक केली. शेळगी-दहिटणे रोडवरील ढाब्यावर धाड टाकून हॉटेल चालक गोपाळ रमेश पाटील (वय ४३) व ग्राहक सचिन नवनाथ चवरे, म्हाकु पाराजी शिंगाडे व अविनाश नामदेव माने अशा ३ मद्यपींना अटक केली. शिवाय सिकंदर टाकळी (ता.मोहोळ) या ठिकाणी संतोष कुंडलिक चव्हाण (वय ४२) याच्या ताब्यातून हातभट्टी दारू जप्त करून त्याचे विरुद्ध गुन्हा दाखल केला.

ही कारवाई अधीक्षक नितीन धार्मिक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी उपअधीक्षक तथा निरिक्षक सदानंद मस्करे, सूरज कुसळे, दुय्यम निरीक्षक उषाकिरण मिसाळ, रोहिणी गुरव, कृष्णा सुळे, मयूरा खेत्री, सहायक दुय्यम निरिक्षक मुकेश चव्हाण, गजानन होळकर, जीवन मुंढे, जवान चेतन व्हनगुंटी, अण्णा कर्चे, इस्माईल गोडीकट, शोएब बेगमपुरे, प्रशांत इंगोले, अनिल पांढरे, किरण खंदारे, प्रकाश सावंत, रशीद शेख व रामचंद्र मदने यांच्या पथकाने पार पाडली. कोर्ट ऑर्डर्ली मयुरेश भोसेकर यांनी न्यायालयीन प्रक्रियेत मदत केली. शासनाच्या वतीने सरकारी वकील संतोष पाटील यांनी न्यायालयात बाजू मांडली.

# ट्रॅक्टरला परत पाठवला म्हणून चुलत्याकडून पुतण्यास मारहाण

सुराज्य/सांगोला

शेतात ऊस बांधणी करिता भाड्याने आलेला ट्रॅक्टरला परत का पाठविल्याचा जाब विचारल्याच्या कारणावरून चुलते चुलती व चुलत भावाने पुतण्यास मारहाण केली तसेच भांडणे सोडवण्यासाठी आलेल्या भाऊ वडीलांनाही धक्काबुक्की केल्याची घटना २० मे रोजी सकाळी सव्वा आठच्या सुमारास शिरभावी येथील शेतात घडली गणेश प्रमोद चिखले (वय २७) यांनी स्वतःच्या शेतातील ऊस बांधणे करिता भाड्याने ट्रॅक्टर लावला होता परंतु चुलते शरद चिखले यांनी परत पाठविला परत का पाठविला विचारण्यासाठी गणेश गेला असता ती जमीन आम्हाला पाहिजे म्हणून परत पाठविला व त्यावरून बाचाबाची होऊन चुलते शरद चिखले , चुलती शोभा यांनी पुतण्या गणेशला मारहाण केली. त्याचवेळी गणेशचे वडील प्रमोद चिखले व आजोबा सहदेव चिखले हे बांधणे सोडवण्यासाठी आले असता त्यांनाही धक्काबुक्की केली.

### महूद येथे पाच शेळ्या चोरीला

सांगोला : तालुक्यातील महूद बुद्रुक येथील संदीप संपतराव पाटील यांच्या २५००० रुपये किमतीच्या पाच शेळ्या चोरीस गेल्या आहेत. पाटील यांच्या घरासमोर वाडग्यात सात शेळ्या व वाडग्याच्या बाहेर पाच शेळी बोकड होते. वाडग्यातील शेळ्या तशाच ठेवून बाहेर बांधलेल्या दोन शेळ्या, दोन बोकडे, व एक पाटरु असे पंचवीस हजार रुपये किमतीच्या शेळ्या सतरा नेते १८ मे रोजी चोरीस गेल्या आहेत.



# १ जून रोजी आडम मास्तर यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन

सुराज्य/सोलापूर

**माजी आमदार नरसय्या आडम यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन १ जूनला माकपाचे ज्येष्ठ नेते सीताराम येचुरी यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. सायंकाळी ५ वाजता सोलापूर महानगरपालिका समोरील नॉर्थकोट हायस्कूल मैदान येथे आत्मचरित्र प्रकाशन सोहळा होणार आहे.**

भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) चे केंद्रीय समिती सदस्य तसेच महाराष्ट्र राज्याचे राज्य सचिव राहिलेले नरसय्या आडम मास्तर यांनी सोलापूर जिल्ह्यात पक्ष उभारणीसाठी दिलेले योगदान बहुमोल आहे. १९६२ पासून ते कामगार चळवळीत सक्रीय आहेत. त्यांचा जन्म १ जून १९४५ साली सोलापूरच्या पूर्वभागातील एका कामगार कुटुंबात झाला. त्यांची आई लक्ष्मीबाई विडी कामगार तर वडील भारतीय आणि गोवामुक्ती स्वातंत्र्य संग्रामातले सैनिक नारायणराव गिरणी कामगार होते. त्यांनी तीन वेळा महानगरपालिकेचे प्रतिनिधीत्व



व तीनवेळा विधीमंडळाचे प्रतिनिधीत्व केले. त्यांना उत्कृष्ट विधानसभापटू हा पुरस्कार मिळाला होता.

ते पहिल्यांदा १९७८ ला आमदार झाल्यावर त्यांनी कॉ. गोदूताई परुळेकर महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्यामाध्यमातून १० हजार विडी कामगारांना अत्यल्प दरात घर मिळवून दिले. तसेच कॉ.मिनाक्षीताई साने महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या माध्यमातून ५५०० घरे त्यानंतर असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या ३० हजार कामगारांसाठी रे नगर ची योजना अस्तित्वात आणली.

भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी),सोलापूर जिल्हा समितीच्या वतीने ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार कॉ.नरसय्या नारायणराव आडम यांच्या ७९ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून १ जून २०२३ रोजी सांयकाळी ५ वाजता सोलापूर महानगरपालिका समोरील नॉर्थकोट हायस्कूल मैदान येथे आत्मचरित्र प्रकाशन सोहळा होईल. या सोहळ्यास माकपचे महासचिव माजी खासदार सीताराम येचुरी, माकपचे पॉलिटब्युरो सदस्य डॉ.अशोक ढवळे, माकपचे राज्य सचिव डॉ. उदय नारकर, जिल्हा सचिव ॲड. एम.एच. शेख उपस्थित राहणार आहेत.

या पत्रकार परिषदेस मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सचिव मंडळ सदस्य रंगप्पा मरेड्डी, प्रा.अब्राहम कुमार, कुरमय्या म्हेत्रे, सुनंदा बल्ला, व्यंकटेश कोंगारी, सिद्धप्पा कलशेट्टी, नसीमा शेख, शेवंता देशमुख, म.हनिफ सातखेड, अँड.अनिल वासम आदी उपस्थित होते.

### यांचे राहणार योगदान

या पुस्तक निर्मितीसाठी सोलापुरातील अनुभवी पत्रकार दत्ता थोरे, संतोष पवार यांनी आत्मचरित्र लेखनासाठी शब्दांकनाचे परिश्रम घेतले. बाळकृष्ण दोड्डी यांनी समन्वय साधले. महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकार व सिद्धहस्त लेखिका गौरी कानेटकर यांनी संहिता संपादन तर सुहास कुलकर्णी यांनी पुस्तकाचे संपादन केले. माकपचे पॉलीट ब्युरो सदस्य डॉ.अशोक ढवळे यांनी प्रस्तावना दिली आहे.

## वृद्ध दांपत्यांना साडेसहा लाखाला फसवले

**सोलापूर** : बांधकाम व्यवसायामध्ये पैसे गुंतवणूक केल्यास जास्त परतावा देतो मिळवून देतो असे सांगून वृध्द दांपत्याकडून घेतलेले ६ लाख ५५ हजार रुपये परत न देता त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी कय्युम इब्राहिम शेख (रा.बॉम्बे पार्क) यांच्यावर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत सुहासिनी सुधीर कुलकर्णी (वय-७२,रा.वसंत विहार) यांनी फिर्याद दिली आहे.आरोपी शेख याने फिर्यादी कुलकर्णी व त्यांच्या पतीचा विश्वास संपादन करून घेत बांधकाम व्यवसायामध्ये गुंतवणूक केल्यास जास्त परताना मिळवून देऊ असे अश्वासन दिले. यामुळे फिर्यादी यांनी आरोपीकडे ८ लाख २० हजार रुपये गुंतविले. आरोपीने फिर्यादींना त्यातील १ लाख ६५ हजार रुपये परत दिले. उर्वरित रक्कम म्हणजेच ६ लाख ५५ हजार रुपयाचा न वटणारा चेक दिला. याबाबत विचारणा केल्यानंतर आरोपी शेख याने मला पैसे मागायचे नाहीत, पैसे मागितल्यास जीवे ठार मारतो अशी धमकी दिली. या प्रकरणी आरोपी कय्युम शेख याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोसई भोईटे करत आहेत.

## तरुणाला लाखाचा ऑनलाईन गंडा

**सोलापूर** : टास्क पूर्ण करण्याच्या नावाने तरूणाकडून १ लाख पाच हजार रूपये ऑनलाईन पद्धतीने घेत ते पैसे परत न देता फसवणूक केल्याप्रकरणी एका मोबाईल धारक व सोशल मीडियावर वापरकर्त्यांवर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत असिफ आयुब शेख ( वय २४, रा. गजानन नगर, होटगी रोड) यांनी फिर्याद दिली आहे. आसिफ शेख हे घरात असताना त्यांना सोशल मीडियावर एक लिंक आली. त्या लिंकवर क्लिक केल्यावर त्यांना एका अनोळखी इसमाने फोन करून टास्क बद्दलची माहिती देत त्यांचा विश्वास संपादन करून घेतले. त्यानंतर फॉर्म भरताना शेवटी पैसे भरण्यास सांगण्यात आले. यामुळे त्यांनी सुरवातील पैसे भरले. नंतर मात्र जर पुढील टास्क न केल्यास तुमचे पैसे परत येणार नाहीत असे सांगितले. यामुळे फिर्यादीने पुन्हा पैसे भरले. त्यानंतर तुम्ही टास्क पूर्ण केला आहे. यासाठी तुम्हाला एकूण २ लाख ३९ हजार २०० रुपये येतील, पण टॅक्स पोटी आणखी ४७ हजार रुपये भरावे लागतील असे सांगितले. यामुळे फिर्यादीने हे पैसे कोणत्या ऑफिसमध्ये भरायचे आहे त्या ऑफिसचा पत्ता द्या, असे विचारल्यानंतर समोरील व्यक्तीने उडवा उडवीचे उत्तर दिले. यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर शेख यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून एका मोबाईल धारकावर व सोशल मीडिया वापरकर्त्यांवर गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक बाळकृष्ण हनपुडे-पाटील हे करत आहेत.

## तरुणाच्या डोक्यात फरशी घातली; गुन्हा दाखल

**सोलापूर** : गाडी सावकाश चालवत जा असे म्हटल्याने तरुणाच्या डोक्यात फरशीचा तुकडा घालून जखमी केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दीपक उर्फ पठाण मोहन जाधव (रा.मंजुनाथ नगर,रामवाडी) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या इसमाचे नाव आहे.ही घटना १८ मे रोजी रात्री साडेसात वाजण्याच्या




सुमारास मंजुनाथ नगर येथे घडली.याप्रकरणी शैलेश राजप्पा जाधव (वय-२८,रा.मंजुनाथ नगर,रामवाडी) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. शैलेश व त्यांची पत्नी भाग्यश्री असे दोघेजण त्यांच्या किराणा दुकानात बसले होते.त्यावेळी दीपक उर्फ पठाण मोहन जाधव हा फिर्यादी यांच्या दुकानासमोर येऊन जोरात गाडीचा ब्रेक मारला.त्यावेळी फिर्यादी यांनी गाडी सावकाश चालवत जा असे म्हणाले असता,दीपक हा गाडीवरून उतरून फिर्यादी यांना शिवीगाळ करून तेथेच पडलेला फरशीचा तुकडा डोक्यात घालून त्यांना गंभीररित्या जखमी केले.असे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोलीस हवालदार येलगुलवार हे करीत आहेत.

## दारू पिण्यासाठी पैशाचा तगादा ; एकावर गुन्हा

**सोलापूर** : आरिफ सलीम शेख (वय-३०,रा.मराठा वस्ती भवानी पेठ) हे घरी असताना त्यांचा मधला भाऊ आसिफ सलीम शेख हा दारू पिऊन येऊन आजी पार्वती नवीलाल शेख यांना पुन्हा दारू पिण्यासाठी पैशाचा तगादा लावून शिवीगाळ करून घरातील सामानाची आदळ आपट केली.त्यावेळी आजी घरात झोपलेली असताना तिच्या अंगावर घरातील लोखंडी कपाट पडल्याने आजीचे हाताचे चमडे निघाले असून,तिच्या छातीला व कमरेला मुक्का मार लागून जखमी झाल्या आहेत.ही घटना दि.१८ मे रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास मराठा वस्ती येथे घडली.अशा आशयाची फिर्याद आरिफ शेख यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून आसिफ सलीम शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास मपोह.ओहळ या करीत आहेत.

## शिवीगाळ केल्याच्या कारणावरून मारहाण

**सोलापूर** : माझ्या मुलीला शिवीगाळ का केली या कारणावरून दगडाने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चंदू जेठप्पा चव्हाण,कैलास चव्हाण,जॅकी चव्हाण (सर्व. रा. पारधी वस्ती,चैतन्य मार्केट,विजापूर रोड,सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.ही घटना १७ मे रोजी पारधी वस्ती चैतन्य मार्केट येथे दुपारी बारा वाजता घडली.याप्रकरणी महादेव रंगू पवार (वय-४०,रा. पारधी वस्ती,चैतन्य मार्केट) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.महादेव हे घरी असताना त्यांचा मुलगा अजय यांचा सासरा चंदू चव्हाण याने माझ्या मुलीला शिवीगाळ का केली व त्रास का दिला असे म्हणून कैलास चव्हाण याने हातातील दगडाने मारून जखमी केले.त्यानंतर चंदू चव्हाण व जॅकी चव्हाण यांनी अजय याला काठीने मारहाण करून शिवीगाळ करत फिर्यादी महादेव पवार यांना मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोलीस हवालदार जाधव हे करीत आहेत.

## डिजीटल बॅनर, मॅटिंगच्या गोडाऊनला आग

**सोलापूर** : रविवार पेठेतील एका डिजीटल बॅनर, मॅटिंगच्या गोडाऊनला शुक्रवारी अचानक दुपारच्या सुमारास आग लागली. या आगीत बॅनर, मॅटिंग जळून खाक झाले आहे. अंदाजित १९ ते २० लाखांचे नुकसान झाल्याची प्राथमिक अंदाज वर्तविण्यात आला आहे. शुक्रवारी दुपारी अडीच वाजता रविवार पेठेतील अग्निशामक दलास बाबुराव खरात यांच्या गोडाऊनला आग लागल्याचा फोन आला. त्यानंतर तात्काळ तीन गाड्या घटनास्थळाकडे रवाना झाल्या.आगी भडकत असतानाच पाण्याचा फवारा जोरात मारून अर्ध्या तासात आग विझविण्यात आली. या आगीत पत्राशेड, प्लॅस्टिक, लाकड, बॅनर, मेटिंग, मशिनरी, खुर्च्या, टेबल व अन्य साहित्य जळून खाक झाले आहे. गोडाऊनमध्ये लाईट नव्हती.त्यामुळे आगीचे नेमकं कारण समजू शकले नसल्याचे अग्निशामक दलाने सांगितले.

# काकडे फाऊंडेशन-देऋब्रा यांच्यात सामंजस्य करार

## काकडे ट्रस्टकडून एक कोटी रूपयांचा संरक्षित निधी देऋब्राकडे जमा

सुराज्य/सोलापूर

येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था आणि कै.ल.गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशन या दोन संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात आला असून या दोन्ही संस्थांच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रम राबविण्याचा निर्णय दोन्ही संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत घेण्यात आला. यासाठी काकडे फाऊंडेशनकडून एक कोटी रुपयांचा व्यवस्थापन संरक्षित निधी देण्यात आल्याची माहिती देऋब्राचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर आणि अमेरिकेत स्थायिक झालेले काकडे फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. मधूसुदन काकडे व डॉ. सविता काकडे यांनी दिली.




कै. ल. गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशन आणि देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूर या दोन्ही संस्था गेल्या अनेक वर्षापासून विविध उपक्रम राबवतात. यापुढेही समाजातील प्रत्येक घटकांसाठी विविध उपक्रम राबवण्याचे दोन्ही संस्थांमधील सामंजस्य करारात ठरवण्यात आले. ल.गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशनने देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेकडे एक कोटीचा व्यवस्थापन संरक्षित निधी जमा केला. काकडे फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. मधुसुदन काकडे व डॉ.सविता काकडे यांनी हा धनादेश नुकताच संस्थेकडे सुपूर्द केल्याचे डॉ.येळेगावकर यांनी सांगितले.

## अवलिया कलावंत कनकट्टीचा राष्ट्रीय विक्रम



**सोलापूर** : सोलापूरचा प्रसिध्द हरहुन्नरी अवलिया कलावंत अंबादास कनकट्टी याने १६ एप्रिल २०२३ रोजी चार्ली चॅप्लिन यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त अंबादास कनकट्टी यांनी सलग १२ तास १२ मिनिटे आणि १२ सेकंद चार्लीच्या पेहरावात जागोजागी फिरत तणावग्रस्त मनावर हास्य विनोदाची आनंददायी शिंपण करत लोकांच्या मनात खोलवर दडलेल्या चार्लीच्या आठवणी जाग्या केल्या. . या उपक्रमातून त्याच्याकडून सहजच राष्ट्रीय विक्रम घडला.

ही हास्याची यात्रा मार्कंडेय मंदिर, सिद्धेश्वर देवस्थान, छ. शिवाजी महाराज महामानव विश्वरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास अभिवादन करुन सुरु केली. आजच्या धकाधुकीच्या जीवनात सतत तणावाखाली असलेल्या शालेय स्तरापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचून तसेच पोलीस स्टेशनमध्ये जाऊन त्याने खाकी वर्दीतील सर्वांना आनंदीत करत त्यांचे हास्यपूर्ण मनोरंजन करीत त्यांची वाहवाह मिळवली. यावेळी नितीन अनवेकर, विजयकुमार घाताडे, पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे, बार्शीचे नयुब मंत्री, विठ्ठल चन्नपट्टण यांनी सत्कार केले.



## कारंब्यात रक्तदान शिबीर संपन्न

**उ. सोलापूर** : कारंबा येथील शंभूतख्त प्रतिष्ठानने धर्मवीर संभाजी महाराज जयंतीनिमित्त जिल्हा परिषद शाळेत रक्तदान शिबिर घेण्यात आले. ९० युवकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. सिद्धेश्वर ब्लड बँक,प्रतिष्ठान मधील सदस्य,स्थानिक ग्रामस्थ यांनी शिबीर यशस्वी परिश्रम घेतले. जयंतीनिमित्त वर्गणी गोळा करून मिरवणूक, डीजे मिरवणुकीला फाटा देत युवकांनी पाहिल्यादाच रक्तदान शिबिर घेतल्याने समाधान व्यक्त केलं जातं आहे.

## आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

**सोलापूर** : महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस प्रशासनाधिकारी हनुमंत जाधवर यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रर्यवेक्षक संतोष. बुलबुले, निरोपर सय्यद, मुख्य लिपिक काशिनाथ बिराजदार, लेखापाल माहेजीबन शेख,रेशमा माचल, सायली ढोले, मल्लिनाथी हिरेमठ,महेश वालावलकर,अमोल गायकवाड, अविनाश शिंदे आदी उपस्थित होते.

## कलावंतच जनतेचे प्रश्न मांडू शकतात : प्रा. शिंदे

सुराज्य/मंगळवेढा

सध्याच्या परिस्थितीत अनेक नेते सत्तेसाठी कोणतेही पक्षात उड्या मारतात त्यामुळे जनतेचे प्रश्न तसेच राहतात, नेते सर्व काही आलबेल असल्याचे सांगतात पण जनतेच्या प्रश्नांची जाणीव कलावंतच करून देतात आणि त्यांचे प्रश्न कलावंतच मांडू शकतात, असे प्रतिपादन कवी प्रा.सुरेश शिंदे यांनी व्यक्त केले.

मंगळवेढा येथे आयोजित कविसंमेलनात ते बोलत होते. यावेळी गटविकास अधिकारी आनंद लोकरे, औदुबर वाडदेकर, भारत पाटील,हजरत काझी, बहुजन रयत परिषदेच्या प्रदेशाध्यक्षा ॲड. कोमल साळुंखे, मनिषा सकट, प्राचार्य चिदानंद माळी, विश्वंभर काळे, कृष्णदेव चौगुले, कांतीलाल इरकर बसवराज कोरे, शशिधर पाटील दादासाहेब वाघमारे आधी उपस्थित होते.या कविसंमेलनात नारायण पुरी, अविनाश भारती, शिवाजी बंडगर,अनंत राऊत, खलील मोमीन, डी.के.शेख, नितीन चंदनशिवे,भरत दौंडकर ,शिवाजी सातपुते, रमजान मुल्ला, आणि तालीब सोलापूरी हे सहभागी झाले.

सूत्रसंचालन प्रा.सुरेश शिंदे व इंद्रजीत घुले यांनी केले. ओय साहेब लागू द्या पाय,अनुभव घ्यावा कशीय शेतीय या कवितेतून दुष्काळी भागातील शेतकऱ्याला शेती करतानाचा अनुभव आणि शासकीय उपाययोजनेचा कागदोपत्री अंमलबजावणीवर आधारीत खदलाबदली या कवितेतून शिवाजी बंडगर यांनी शेतकरी प्रश्नावर कवितेतून आवाज उठविला.

## चोरट्याने घरासमोरून दुचाकी पळवली

सुराज्य/सोलाापूर

राहत्या घरासमोर पार्क करून ठेवलेली दुचाकी क्र.एमएच.१३.एपी.७६२३ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना १७ ते १८ मे दरम्यान बालाजी मंदिर रंगराज नगर येथे घडली.

याप्रकरणी प्रदीप विलास पालमुरी(वय-३७,रा.बालाजी मंदिर समोर रंगराज नगर यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास मपोह.मैदाड हे करीत आहेत.

# काळ्या बाजारात नेताना युरिया पकडला

## अकलूज पोलिसांची कारवाई

सुराज्य/अकलूज

माळशिरस येथील साई अँग्रो या खत विक्रीच्या दुकानातून शेती उपयोगी युरिया अन्य औद्योगीक कारणासाठी किंवा कृत्रिमरित्या युरिया खताचा तुटवडा निर्माण करुन चढया दराने विक्री करण्यासाठी ट्रकमधुन घेवुन जात असताना पाटीलवस्ती नजीक अकलूज पोलिसांनी पकडून संबधितांवर कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे.

१८ मे रोजी दुपारच्या सुमारास पोलीस अंमलदार हे पेट्रोलींग करीत होते. अकलुज ते माळशिरस रोडवर पाटीलवस्ती येथे वाहन ट्रक नंबर एम.एच. ४२ / एक्यु १६८१ यामध्ये विना पावती खत विक्रीसाठी घेवून चालला असलेबाबत माहिती पोलीसांना मिळाली. त्या ठिकाणी जावून युरीयाने भरलेले वाहन पोलीस ठाणेस आणुन कृषी अधिकाऱ्यांना कळविले होते. कृषी विभागाच्या चौकशीमध्ये र युरीया अशिष अनिलकुमार लोखंडे यांच्या साई अँग्रो च्या दुकानातील आसल्याचे उघड झाले.नवशाद इब्राहीम मुजावर रा. पिराची कुरोली ता. पंढरपूर यांनी बेकायदेशीरपणे युरीया खरेदी करुन वाहन मालक सोमनाथ ज्ञानोबा बनसोडे (रा. वेळापूर) यांनी शासनाची फसवणुक करुन शेती उपयोगी युरिया अन्य औद्योगीक कारणासाठी किंवा कृत्रिमरित्या युरिया खताचा तुटवडा निर्माण करुन चढया दराने विक्री करण्यासाठी वाहन ट्रक नंबर एम. एच. ४२ / एक्यु १६८१ या वाहनातुन घेवून जात असल्याने निष्पन्न झाले.याबाषत अकलुज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे,अपर पोलीसअधिक्षकहिम्मतजाधव,उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपूजे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड पोहेकॉ शिवकुमार मदभावी,अनिल शिंदे,विक्रम घाटगे,प्रसाद सुर्यवंशी,रणजीत जगताप, यांनी केली आहे.सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बबन साळुंके हे करीत आहेत.

## हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी पळवली

**सोलापूर** : एसटी स्टँड च्या बाजूस असलेले झांबरे नर्सिंग होम येथे दुचाकी क्र.एमएच.२५.झेड.९६१८ ही हँडल लॉक करून ठेवलेली असताना चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना १८ मे रोजी रात्री आठ ते नऊ वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी कैलास नागनाथ महाजन (वय-४५,रा.विद्यानगर,शेळगी) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

**जाहीर समन्स**

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा), सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर** — **अर्जदार बँक**

अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक सोलापूर

विरुध्द

**खालील तपशिलातील नमूद केलेले बँकेचे थकबाकीदार सभासद** — **जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार क्रमांक | जाब देणार यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | २०१६/ २०२२-२३ | १,६३,५०८.०० | १<br>२ | कार्तिकी एंटरप्रायजेस प्रो. प्रा. अमृता प्रशांत काकडे रा. ३१७९, विठाई, तानाजी चौक, पंढरपूर, सोलापूर ४१३३०४<br>काकडे प्रशांत पुरुषोत्तम रा. ३१७९, विठाई, तानाजी चौक, पंढरपूर, सोलापूर ४१३३०४ |
| २ | २०२०/ २०२२-२३ | १,११,९०६.०० | ४ | प्रदिप गौतम बनसोडे रा. भीम नगर, सांगोला, सोलापूर ४१३३०७ |
| ३ | २०२१/ २०२२-२३ | २९,७०,९७१.०० | ३ | डोईजोडे विनायक बाळकृष्ण रा. ११८५, उत्तर कसबा, टिळक चौक, सोलापूर ४१३३०७ |

याकामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील जाब देणार यांना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतू जाब देणार समन्स रुजू न झाल्याने/ त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरचे जाहीर समन्स देत आहोत.

उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने **वार- शुक्रवार दि. ०९.०६.२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता** दाव्यासंबंधीच्या कागदपत्रासह आपण या कार्यालयात हजर व्हावे.

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

म्हणून दिनांक १९/०५/२०२३ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

# १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल; नऊ आरोपी फरार

## शासकीय कामात अडथळा

सुराज्य/अक्कलकोट

चपळगाव (ता.अक्कलकोट) येथे शासकिय कामात अडथळा आणल्या प्रकरणी तब्बल १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आले होते. त्यापैकी पाचजणांचे जामीन अर्ज कोर्टाने फेटाळले आहेत. तर नऊ आरोपी फरार झाले आहेत. सहा आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. फरार आरोपी गावात बिनधास्त पणे मोकाट फिरत असून त्यांना तात्काळ अटक करून कारवाई करावी अशी मागणी फिर्यादी कडून होत आहे.

या ठिकाणी भूमिअभिलेख कार्यालय अक्कलकोट येथील टीम शेत मालक अर्जदार उमेश पाटील यांचे शेतजमीन मोजणी साठी रीतसर आले होते. त्याप्रसंगी शेजारील एका शेतकऱ्यांनी शासकिय कामात अडथळा आणत बेकायदेशीर पणे जमाव जमवून दहशत माजवण्याचा प्रयत्न केला. म्हणून नातेवाईकांसह १६ जणांविरुद्ध उत्तर पोलीस ठाण्यात अधिकारी प्रभाकर शिंदे यांनी रीतसर गुन्हा दाखल केले होता. त्यानुसार पोलिसांनी आरोपी अटक करण्यासाठी वारंवार गेले असता, आताहुल्ला पटेल, कलीममुल्ला पटेल, समीर पटेल, सईद पटेल, खलील पटेल, चुमन जाहागीरदार यांच्यावर अटकेची कारवाई करण्यात आले आहे. त्या सर्वांना न्यायालयीन तुरुंगात टाकण्यात आले आहे. तसेच इसाक पटेल, नुरजा पटेल, नवशाद जामदार(इनामदार), सोहेब पटेल, नासिर पटेल असे पाच जणांचे अटकपूर्व जमीन अर्ज कोर्ट के. डी. शिरभाते यांनी फेटाळले आहे. यामुळे शाकिर पटेल, आलीम पटेल, इन्नूस पटेल, फैजान पटेल, रफिक जमादार यांच्यासह अनोळखी पाचजण सध्या फरार असून त्यांना अटक करण्यासाठी पोलिस त्यांच्या मार्गावर आहेत.ही घटना दि.३ मे-२३ रोजी घडली होती.

त्यानुसार उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.अधिक तपास हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

### आरोपींना तत्काळ अटक करण्याची मागणी

शासकीय कामात अडथळा आणण्याचे मुजोरी अलीकडे तालुक्यात वाढत चालली आहे. यामुळे वहिवाट रस्ता, शेत मोजणी, प्लॉट मोजणी, पंचनामा, विकास कामे करणे, शासकीय सेवा बजावणे अधिकारी, कर्मचाऱ्यांना जिकिरीचे होत आहे. अनेक वेळा अंगावर धावून येणे, मारहाण करणे आशा प्रकारात वाढ होत आहे. परिणामी गरजू लोकांना न्याय मिळण्यात अडचणी येत आहेत. परिणामी अशा प्रकारचे गुन्हा दाखल व कारवाईमुळे लोकांकडून स्वागत होत आहे. फरार आरोपी गावात मोकाट फिरत असून त्यांना तात्काळ अटक करून कारवाई करावी अशी मागणी फिर्यादी कडून होत आहे



## वेळापूर ग्रामपंचायतीच्यावतीने ५ टक्के निधीचे दिव्यांगांना वाटप

**वेळापूर :** वेळापूर ग्रामपंचायतीच्यावतीने पाच टक्के अपंग निधीचे अपंगांना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उत्तमराव जानकर तसेच वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजीकाका चव्हाण यांच्या हस्ते अपंगांना प्रत्येकी दहा हजार रुपयांचे धनादेशाचे वाटप करण्यात आले. पोपट ननवरे, सौदागर पोरे, सोनाली माने, गौरव जाधव, बाळू साठे, गिरीजाबाई मंडले, संदेश लोंढे, दत्तू पवार, शिवाजी जाधव, ओंकार वाडकर यांनी याचा लाभ घेतला. यावेळी उत्तमराव जानकर म्हणाले की, 'वेळापूर ग्रामपंचायत हे प्रत्येक वर्षी अपंग निधीचे वाटप करते, अपंगांनी मिळालेल्या निधीचा छोटा व्यवसाय काढण्यासाठी उपयोग करावा अथवा उदरनिर्वाच्या साधनासाठी शेळीपालन करावे. कार्यक्रमाला सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजी काका चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य नानासो मुंगुस्कर, हनुमंत वायदंडे, डॉ. स्नेहलता जीवन जानकर, सिमरन मुलाणी, छाया साठे, अंजना माने तसेच काशिनाथ आडत, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, महादेव म्हेत्रे, शंकर आडत, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, शिवसेनेचे रामकृष्ण जाधव, विनायक माने, अमोल पनासे, रायचंद खाडे, जवान माने देशमुख, विजय बनसोडे, आप्पाराव कांबळे, संजय माने यांच्यासह वेळापूर ग्रामपंचायतीचे कर्मचारीवर्ग, ग्रामस्थ उपस्थित होते.



## भंडारकवठे येथील श्री चौडेश्वरी देवीची यात्रा उत्साहात

**दक्षिण सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथे श्रीचौडेश्वरी यात्रा यंदा साला सालाबदाप्रमाणे संपन्न झाली. यावेळी भंडारकवठ्यात चौडेश्वरी देवी यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भंडारकवठ्यात गुरुवार दि. १८ मे आणि शुक्रवार दि. १९ मे २०२३ या दोन दिवशी चौडेश्वरी देवी यात्रा महोत्सव मोठ्या भक्तीभावाने साजरी केली जाते. या यात्रा महोत्सवात गुरुवारी दुपारी चौडेश्वरी देवीची ओटी भरुन विधीपूर्वक महापूजा, यानंतर सुहासिनी महिला, गावातील मानकरी पुजारी यांच्यासह सर्वांना महाप्रसाद वाटप.रात्री बारा वाजता चौडेश्वरी देवीच्या बाळबट्टलची भव्यदिव्य मिरवणूक. शुक्रवार दि. १९ रोजी सकाळी चौडेश्वरी देवीची महापूजा. गावातील भाविक भक्तांकडून ओटी भरणे, नैवेद्य कार्यक्रम, सायंकाळी पाच वाजता चौडेश्वरी देवीची भव्य मिरवणूक यानंतर गावीतील मुख्य वेशीत धाडस तरुणांचा मार चाबुकाचा हा खेळ उपस्थित भाविक भक्तांना पाहता येणार आहे. शेवटी चौडेश्वरी देवीची गावातून भव्य मिरवणूक काढून यात्रा महोत्सवाची सांगता होणार आहे.



## खो-खोपटू निखिल कापुरे यांची मुंबई पोलीस दलात नियुक्ती

**सोलापूर :** खो-खोपटू निखिल कापुरे याची ५ टक्के खेळाडू आरक्षणातून मुंबई पोलीस दलात नियुक्ती झाली. निखिल याने २०१९ मध्ये उत्कर्ष क्रीडा मंडळाकडून जिल्हा खो-खो स्पर्धेत भाग घेतला होता.

सोलापुरातच ह. दे. प्रशालेच्या मैदानावर झालेल्या राज्य स्पर्धे तील कामगिरीवर त्याची महाराष्ट्र पुरुष संघात निवड झाली होती. त्यात महाराष्ट्रने रौप्य पदक संपादिले होते. याच कामगिरीवर त्याची नियुक्ती झाली. त्या निमित्त निखिलचा सत्कार उत्कर्ष क्रीडा मंडळातर्फे माजी राष्ट्रीय खेळाडू मीना ढेरे यांच्या हस्ते झाला. तसेच जिल्हा खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांच्या हस्तेही त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी असोसिएशनचे ज्येष्ठ सदस्य रवींद्र नाशिककर, तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव, सचिव सुनील चव्हाण, आशिष अवधूर्ती, उमाकांत गायकवाड, अजित शिंदे आदी उपस्थित होते.

# शासन 'आपल्या दारी' महाशिबीर

## ▶ पहिल्या दिवशीच १०३१ लाभार्थ्यांना दाखल्यांचे वाटप

सुराज्य/सोलापूर

**शासन आपल्या दारी व महाराजस्व अभियानांतर्गत तहसील कार्यालय, उत्तर सोलापूरच्यावतीने प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित महाशिबिरास पहिल्या दिवशी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**

सुराज्य/सोलापूर

नॉर्थ कोट प्रशाला, पार्क चौक येथे दि. १८ ते २६ मे या कालावधीत सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत हे महाशिबिर आयोजित करण्यात आले असून यामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेयर आदी दाखले देण्यात येत आहेत. यासोबतच पंचायत समिती व कृषी विभाग यांनीही या महाशिबिरामध्ये सहभाग नोंदवून आपल्या विभागाच्या योजनांचे लाभ वाटप लाभार्थ्यांना केले.

महसूल विभागाचे वतीने एकूण ६४० उत्पन्नाचे दाखले, ७५ जातीचे दाखले, ४८ नॉन क्रिमीलेअर दाखले, ३३ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक दाखले, १६८ रहिवासी दाखले वितरण करण्यात आले. महसुली विभागाचे वतीने आज एकूण ९७२ दाखल्यांचे वितरण करण्यात आले व कृषी विभागाचे वतीने कृषी यांत्रिकिकरण उपअभियान अंतर्गत ६ लाभार्थी, राष्ट्रीय कृषी विकास योजना याचे ५ लाभार्थी, मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना वैयक्तिक शेततळे ५ लाभार्थी, आत्मा अंतर्गत महिला बचत गट १ लाभार्थी यांना पूर्ण संमतिपत्र याचे वाटप करण्यात आले.

पंचायत समिती उत्तर सोलापूर यांच्यावतीने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत वैयक्तिक शौचालयाच्या २२ लाभार्थ्यांना लाभ वाटप करण्यात आला. तसेच महाराष्ट्र महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत ३ लाभार्थ्यांना सिंचन विहिरींचा कार्यारंभ आदेश देण्यात आला व दोन लाभार्थ्यांना जनावरांचा गोठा गोठा मंजूर करण्यात येऊन त्याचा कार्यारंभ आदेश देण्यात आला व आपले सरकार अंतर्गत २५ लाभार्थ्यांना दाखले वाटप करण्यात आले. महसूल विभाग, पंचायत समिती विभाग व कृषी विभाग असे तिन्ही विभागाचे वतीने आजच्या शिबिरामध्ये एकूण १०३१ लाभार्थ्यांना दाखल्यांचे व वैयक्तिक लाभांच्या योजनेचे वाटप करण्यात आले.



सदर महाशिबिराला जिल्ह्याचे प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी भेट दिली. यावेळी त्यांच्या हस्ते काही प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. यावेळेस उपविभागीय अधिकारी सोलापूर क्रमांक १ विठ्ठल उदमले, उत्तर सोलापूरचे तहसीलदार सैपन नदाफ, तालुका कृषी अधिकारी मनीषा मिसाळ, निवासी नायब तहसीलदार विश्वजीत गुंड, नायब तहसीलदार (महसूल) विजय कवडे तसेच महसूल विभागाचे अधिकारी व तहसील उत्तर सोलापूरचे सर्व कर्मचारी, मंडळ अधिकारी, तलाठी व महा ई सेवा केंद्राचे संचालक ऑपरेटर इ. उपस्थित होते.

## वळसंग ग्राम कचरा मुक्त करा : सीईओ स्वामी

### ग्रामस्थांना दिली स्वच्छतेची शपथ

सुराज्य/सोलापूर



वळसंग कचरा मुक्त करा. असे आवाहन सोलापूर जिल्हा परिषदेचे प्रशासक व सीईओ दिलीप स्वामी यांनी केले.

वळसंग येथे समर्थ सेवा मंडळ व हुतात्मा जलसंवर्धन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने वळसंग गावातील परंतु नोकरी निमित्त बाहेरगावी असलेले व स्थानिक उत्कृष्ट काम करणारे व्यक्तींचा गौरव व सीईओ दिलीप स्वामी यांचे हस्ते करणेत आला. वळसंग येथे समर्थ सेवा मंडळ येथील हॉलमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले होते. याप्रसंगी माजी जिल्हाधिकारी व यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, वळसंग पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, प्रा. काळे, आयुब आत्तार प्रमुख उपस्थित होते.

यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी 'कचरा मुक्त ग्राम'ची शपथ सर्वांना दिली. यावेळी सीईओ दिलीप स्वामी म्हणाले, 'वळसंग येथे समर्थ सेवा मंडळ व हुतात्मा जलसंवर्धन समिती दोन्ही संस्थांच्यावतीने वळसंगच्या विकासात जलसंवर्धन व वृक्ष संवर्धनाची अनेक कामे होत आहेत. त्याचबरोबर ग्रामस्वच्छता अभियान, प्लास्टिक मुक्त गाव या सारख्या अनेक कामात आपण सर्वजण पुढाकार घेत आहोत. डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांचे पाणी व स्वच्छतेतील योगदान महत्वपुर्ण आहे. या प्रसंगी सत्कारमुर्ती

माजी उप अभियंता रमेश चौगुले, रेवणसिध्द प्याटी, सुरेश दुधगी,विरेश थळंगे,ईरप्पा केशेट्टी ,निलाबाई जिड्डीमनी, लक्ष्मण घोडके,वासंती दुधगी,दिपक गायकवाड,स्मीता माळी ,सिध्दाराम वाघमारे,बबीता राठोड,अन्वर तडमुड, मुश्ताक मणुरे, शिवानंद गोटे, सिध्दाराम गणेर,राजकुमार धनशेट्टी, विनोद हुमनाबादकर, अल्ताफ पटेल, कलय्या स्वामी, दिनकर नारायणकर यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी स्वामी समर्थ सेवा मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.सुत्रसंचालन प्रतिभा दुधगी यांनी केले.

## मीना बाजारात तोडफोड; एकास पोलीस कोठडी

सुराज्य/सोलापूर

नई जिंदगी चौक येथील हॉटेल कॅफे लीडर येथे मारहाण करुन तोडफोड केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपीस प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी पारशेट्टी यांनी दोन दिवस पोलीस कोठडी सुनावली.

रमजान ईदच्या अनुषंगाने फिर्यादीने त्याच्या हॉटेलसमोर खवा विक्रीसाठी टेबल लावले असता आरोपी अताउल्ला पठाण, हिदायतुल्ला पठाण, रहेमान पठाण, ओसामा पठाण, जुबेर पठाण हे तेथे आले व फिर्यादीला तुमच्या हॉटेलसमोर खवा विक्रीसाठी लावलेला टेबल काढ, तुम्हाला हॉटेलच्या आतमध्ये जागा नाही का? असे म्हणून मारहाण करुन हॉटेलात घुसले व हॉटेलातील सामानाची तोडफोड केली. आसीफ शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द एमायडीसी पोलीसांत गुन्हा दाखल झाला होता.

पोलिसांनी अताउल्ला पठाण यास अटक करुन प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी पारशेट्टी यांच्यासमोर हजर केले असता आरोपीस २२ मे पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश केला. सरकारपक्षातर्फे ॲड. सार्थक चिवरी यांनी तर आरोपीतर्फे ॲड. अभिषेक गुंड व ॲड. मनोहर गोविंदे यांनी काम पाहिले.

## दक्षिणला राज्यातील क्रमांक एकचा तालुका करणार

▶ आ. देशमुख यांचे प्रतिपादन ▶ माळकवठे-औज रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

सुराज्य/दक्षिण सोलापूर

ज्या कामांचे लोकार्पण केले ती कामे आता पूर्ण होणार आहेत. दक्षिण तालुक्यातील प्रत्येक गावात रस्ते होत आहेत. दक्षिणचा विकास करून राज्यात क्रमांक एकचा तालुका करणार असल्याचे प्रतिपाद आ. सुभाष देशमुख यांनी केले.

शनिवारी सुमारे ३ कोटी ४० लाखांच्या माळकवठे-औज-मंद्रुप ते तद्देवाडी रस्त्याच्या कामाचा शुभारंभ आ. सुभाष देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी सरपंच मल्लिकार्जुन करके, धर्मराज गडदे, महेंद्र उंबरजे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य डॉ. चनगोंडा हवीनाळे, अहिल्याबाई होळकर विद्यापीठाचे सिनेट सदस्य महादेव कमळे, हनुमंत कुलकर्णी, यतिन शहा, अप्पासाहेब मोटे, दिपाली व्हनमाने आदी उपस्थित होते.

आ. देशमुख म्हणाले की, 'मोदी सरकारच्या काळामध्ये दलाली बंद झाली आहे त्यामुळे विघ्न संतोष लोक चांगल्या कामांमध्ये खोडा घालत आहेत.



मात्र कोणी कितीही विरोध केला तरी दक्षिण तालुक्याचे नंदनवन करणारच आहे. देशातील रस्ते मजबूत आणि उत्तम होऊ लागल्यामुळे तालुक्याचा आणि देशाचा विकास हा झपाट्याने होत आहे.'

यावेळी बिरोबा मंदिराच्या सभामंडपाचे भूमिपूजनही आ. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मल्लिकार्जुन बन्ने, गुरूपाद कोरे, चिदानंद अक्कलगी, यल्लालिंग तुपे, ताहेरताज पटेल, भिमाशंकर पुजारी, चिदानंद माळीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## महापालिकेच्या 'मेरी लाईफ, मेरा स्वच्छ शहर' उपक्रमाचे उद्‌घाटन



सुराज्य/सोलापूर

स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण-२०२३ अंतर्गत गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाच्या दिलेल्या सूचनानुसार संपूर्ण देशात २० मे २०२३ ते ०५ जून २०२३ या कालावधीमध्ये 'मेरी लाईफ, मेरा स्वच्छ शहर' हे उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या अनुषंगाने शनिवारी रोजी घनकचरा व्यवस्थापन विभागाच्यावतीने शहरातील आठ ठिकाणी करण्यात आला.

यावेळी मनपा उपायुक्त मच्छिंद्र घोलप व सहा. आयुक्त विक्रमसिंह पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेण्यात आले.

यावेळी मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधीक्षक अनिल चराटे, मुख्य आरोग्य निरीक्षक लोखंडे, नडीमेटला, गोटे, तमशेट्टी, इंगळे, नागटिळक, शेख, नल्लामंदू तसेच सर्व आरोग्य निरीक्षक व मनपा कर्मचारी उपस्थित होते. या आरआरआर सेंटर्सच्या उद्देशाने शहरातील नागरिकांनी आपल्या घरातील वापरात नसलेले परंतु उपयोग करण्यात येईल असे वस्तू मध्ये जमा करायचे आहे. हे वस्तू जमा केल्यावर म.न.पा. ते वस्तू गोर-गरीब, गरजू नागरिकांना अथवा विद्यार्थ्यांना देण्यात येईल.

शहरात म. फुले सुपर मार्केट, अहेरकर बजाज शोरूम शेजारी, रविवार पेठ तेलुगू मनपा शाळा क्र. १, कुचन शाळा जवळ, पद्मानगर, बास्केट बॉल ग्राउंड शेजारी, नीलम नगर, गणपती मंदिर जवळ, डी-मार्ट च्या पुढे, पाणी टाकी शेजारील आरोग्य निरीक्षक यांचे ऑफिस, माणी नगर, सुंदरा डागा मनपा शाळा, सिव्हिल चौक, सिव्हिल हॉस्पिटलसमोरील आरोग्य निरीक्षक ऑफिस, मार्कंडेय उद्यान शेजारील आरोग्य निरीक्षक यांचे ऑफिस येथे आर.आर.आर. सेंटर सुरू करण्यात आले आहे.

# वळसंगच्या रामलिंग-चौडेश्वरी यात्रेत पोलिसांना मान

## वाजत-गाजत मंदिरात नेण्याची प्रथा आजही कायम

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर-अक्कलकोट रस्त्यावरील वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री रामलिंग चौडेश्वरी यात्रेला संघर्षाची कहाणी आहे. कडक बंदोबस्तात यात्रा पार पडली जाते. यासाठी वळसंग पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना वाजत-गाजत, दिवट्या लावून, जयघोष करत पाचारण करण्यात येते. यंदाही ही प्रथा कायम ठेवण्यात आली. प्रभारी अधिकारी अनिल सनगल्ले यांनी यंदा हा मान स्वीकारून यात्रेला कडेकोट सुरक्षा पुरविली.**

वळसंग येथील श्री रामलिंग-चौडेश्वरी यात्रेला अक्कलकोट, दक्षिण सोलापूरसह कर्नाटक, आंध्रप्रदेश, गोव्यासह अन्य राज्यातील भाविक मोठ्या संख्येने हजेरी लावतात. तब्बल सहा दिवस ही यात्रा सुरू असते. तिसऱ्या दिवशी बाळबट्टलची मिरवणूक काढण्यात येते, यासाठी मोठ्या प्रमाणात बंदोबस्ताची गरज असल्याने यासाठी मान, सन्मानाने मंदिराचे मानकरी, युवक मोठ्या सन्मानाने पोलिसांना पाचारण करून त्यांना सुरक्षा पुरविण्याची विनंती करतात. पाचही दिवस त्यांना अशाच पद्धतीने पाचारण करण्याची पद्धत आहे. आजही ३०० वर्षांनंतरही ही प्रथा कायम आहे. त्यात ना ग्रामस्थांनी खंड पडू दिला ना पोलीस अधिकाऱ्यांनी. यात्रा काळात सपोनि अनिल सनगल्ले यांनी १०० हून अधिक पोलिसांचा ताफा कार्यान्वित करून ही यात्रा यशस्वी केली.

वीर नावाच्या एका बालकाने तब्बल ३०० वर्षांपूर्वी बट्टल म्हणजे वाटी कर्नाटकातील माशाळ येथील यात्रेतून लुटून आणली. बाळाने आणलेली वाटी म्हणजे बाळबट्टल होय. ही चांदीची वाटी माशाळचे लोक पुन्हा लुटून नेतील, ही भीती वळसंगकरांना असल्याने ते सजग राहून प्रचंड सुरक्षिततेत यात्रा करतात. यासाठी तगडा बंदोबस्तही असतो.



प्रभारी अधिकारी अनिल सनगल्ले यांना नागराज कोंडे, विश्वस्त सिद्धाराम चिंचोळी, दाशिमय्या अळगुंडगी, अभी अंकद, समर्थ खैराटे, सिद्धारुढ कण्णगी, सिद्धाराम मुळे, चेतन अंकद, महेश खैराटे यांच्यासह असंख्य युवकांनी विड्याचे पान देऊन त्यांना वाजत गाजत मंदिराकडे घेऊन गेले. रात्रभर त्यांनी त्यांच्या पथकासह सुरक्षा पुरविल्याने यात्रा सुरळीत पार पडली.



## समृद्धी केदार हिचा सत्कार

सुराज्य/सोलापूर

मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने समृद्धी केदारचा त्यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला. सूतगिरणी - वासूद रस्त्यावर असलेल्या घरकुलात राहणाऱ्या समृद्धीला पोलीस भरतीसाठी अकॅडमी लावण्याची इच्छा होती. परंतु घरच्या गरीब परिस्थितीमुळे तीही लावता आली नाही.

मात्र दिवसभर आईबरोबर कामाला जाऊन पहाटे चार वाजता उठून पोलीस भरतीसाठी आवश्यक असणारा व्यायाम सांगोल्याच्या क्रीडा संकुलात तिने केला. कष्ट करण्याची तयारी आणि मनाशी जिद्द ठेवून तिने पहिल्या प्रयत्नात हे यश मिळविले असून लवकरच ती मुंबई पोलीस दलात दाखल होणार आहे. तिच्या या यशाबद्दल आई प्रतिभा बाळासाहेब केदार व भाऊ रणजित केदार यांना मोठा आनंद झाला असून भाऊ रणजित केदार हाही पोलीस भरतीसाठीच प्रयत्न करत आहे.

## दया नायक आता मुंबई क्राइम ब्रँचमध्ये



सुराज्य/मुंबई : एन्काऊंटर स्पेशालिस्ट म्हणून ओळखले जाणारे दया नायक यांची आता मुंबई क्राइम ब्रँचमध्ये नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र एटीएसमधील ३ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर दया नायक आता मुंबई क्राइम ब्रँचमध्ये रुजू झाले आहेत. याबाबत त्यांनी ट्विटरच्या माध्यमातून माहिती दिली आहे.

## अँटॉप हिल पोलीस ठाण्यात निर्दयपणे मारहाण

सुराज्य/मुंबई : सोसायटीतील एका वादाविषयी अँटॉप हिल पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यास गेलेले अॅड. हरिकेष शर्मा व अॅड. साधना यादव या दोन्ही वकिलांना पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नासीर कुलकर्णी यांनी निर्दयपणे मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकाराचा मुंबईतील अनेक वकील संघटनांनी तीव्र निषेध केला आहे. तसेच सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्याबरोबरच मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती संजय गंगापूरवाला, केंद्रीय विधी न्यायमंत्री, राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस व मुंबई पोलीस आयुक्तांकडे याबद्दल लेखी तक्रार देण्याची तयारी वकील संघटनांनी केली आहे.

## जळगाव बाजार समितीत मविआत घमासान

सुराज्य/जळगाव : जळगाव बाजार समिती सभापती निवडणुकीत महाविकास आघाडीच्याच उमेदवारात घमासान झाले. महाविकास आघाडीचे उमेदवार लक्ष्मण पाटील ऊर्फ लकी टेलर यांनी आघाडीचेच दुसरे उमेदवार श्यामकांत सोनवणे यांनी मारहाण केल्याचा आरोप केला. तसेच सभागृहातही दमदाटी करून हात उंच करून मतदान करावयास लावल्याचा गंभीर आरोप केला. मात्र, हा आरोप श्यामकांत सोनवणे यांनी फेटाळाला आहे. सभापती निवडीत महाविकास आघाडीचे श्यामकांत सोनवणे व लक्ष्मण पाटील यांच्यात मतदान होऊन श्यामकांत सोनवणे हे अठरा पैकी पंधरा मते घेऊन विजयी झाले. तर उपसभापतीपदी महाविकासचे पांडुरंग पाटील यांची बिनविरोध निवड झाली. विशेष म्हणजे भाजप आणि शिंदे गटाच्या संचालकांची मतेही महाविकासचे श्यामकांत सोनवणे यांना मिळाल्याने महाविकास आघाडी व भाजप-शिंदे गटाच्या एकीचे आश्चर्य व्यक्त होत आहे.

## आरटीई निधीअभावी ८०० इंग्रजी शाळा बंद

सुराज्य/मुंबई : केंद्र सरकारे शिक्षण हक्क कायदा लागू केला आहे. त्यानुसार इंग्रजी माध्यमातील स्कूलमध्ये आरटीई नुसार विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जात आहेत. परंतु राज्य सरकारकडून या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रतिपूर्ती वेळीच मिळत नाही. परिणामी संपूर्ण राज्यातील सुमारे ८०० पेक्षा अधिक इंग्रजी माध्यमांच्या शाळा बंद पडल्या आहेत. राज्य सरकारकडून शैक्षणिक प्रतिपूर्तीच्या १ हजार ८०० कोटींची रक्कम थकल्याचा दावा महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज असोसिएशन (मेस्टा) चे कार्याध्यक्ष प्रा. विजय पवार यांनी केला आहे. राज्यातील इंग्रजी माध्यमातील स्कूलसंदभात शिक्षण मंत्र्यांनी केवळ द्यावा, तसेच योग्य भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी मेस्टा संघटनेने केली आहे.

## ५९३ शिक्षकांच्या जिल्ह्यांतर्गत बदल्या

सुराज्य/लातूर : लातूर जिल्हा परिषदेच्या शाळा १५ जून २०२३ ला सुरु होणार आहेत. त्यापूर्वी शिक्षकांच्या मागणीनुसार ऑनलाईन माहिती भरुन घेऊन शासन स्तरावरुन बदली पात्र ६३४ पैकी ५९३ शिक्षक, मुख्याध्यापकांच्या जिल्हातंर्गत बदल्या करण्याता आल्या आहेत. बदली झालेले शिक्षक, सहशिक्षक, मुख्याध्यापक यांना ३१ मे २०२३ पर्यंत बदल झालेल्या ठिकाणी रुजू होण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या आहेत. लातूर जिल्ह्यात १ हजार २७८ शाळा आहेत. ज्या शिक्षकाने जिल्हा परिषदेच्या एकाच शाळेत ५ वर्षे सेवा बजावली, तसेच १० वर्षे सेवा बजावली अशा शिक्षकांना जिल्हातंर्गत बदलीसाठी पात्र समजले जाते.

## जिल्हा दूध संघाच्या अध्यक्षा पवार यांचा राजीनामा

सुराज्य/पुणे : पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाच्या (कात्रज डेअरी) पहिल्या महिला अध्यक्षा तथा महानंदच्या संचालिका केशरताई सदाशिव पवार यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. अध्यक्षपदाचा ठरलेला एक वर्षाचा कार्यकाल संपल्याने राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्याकडे मुंबईत जाऊन हा राजीनामा त्यांनी सुपूर्द केला आहे. दरम्यान, आपल्या कार्यकालात अत्यंत स्वच्छ कारभार करुन कात्रज डेअरीचा नावलौकीक, उत्पन्न, उलाढाल हे सर्व वाढविण्यात यश मिळाल्याचे समाधानही त्यांनी व्यक्त केले.

## नीरा-भीमा कारखान्यावर ऊस बिलासाठी आंदोलन

सुराज्य/इंदापूर : ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे ऊस बील मिळावे, यासाठी इंदापूर तालुक्यातील शहाजीनगर येथील नीरा भीमा साखर कारखान्यावर आत्मक्लेश पदयात्रा काढून आंदोलन करणारे अप्पासाहेब जगदाळे व इतर २५० आंदोलकांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. पोलिसांनी परवानगी दिलेली नसतानाही आंदोलनक आंदोलन करीत होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचा भंग केल्याबद्दल आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता वाढ

सुराज्य/मुंबई : शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात नेहमीच वाढ होत असते. कारण महागाईचा निर्देशांक सतत वाढतच असतो. आता न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यातदेखी वाढ होणार आहे. न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ४२ टक्क्यांवर पोहचला असून त्यांच्या पगारात घसघशीत वाढ झालीआहे. विशेष म्हणजे केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्य सरकारच्या दुय्यम न्यायालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा महागाई भत्त्यात ४ टक्के वाढ लागू करण्यात आली आहे. हा महागाई भत्ता सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनाही लागू होणार आहे. १ जानेवारी २०२३ पासून ही वाढ लागू होणार असल्याने कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात फरकही मिळणार आहे.

## नाशकात होणार इलेक्ट्रॉनिक क्लस्टर

सुराज्य/मुंबई : राज्यातील दुसरे इलेक्ट्रॉनिक क्लस्टर नाशिकमध्ये उभारण्याची महत्वपूर्ण घोषणा उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केली. या क्लस्टरकरित एमआयडीसीकडे जागांचे पर्याय उपलब्ध आहेत. त्यासाठी पालकमंत्री दादा भुसे यांनी उद्योजकांसोबत बैठक घेऊन जागा निश्चित करावी. तसेच स्थानिक मोठ्या उद्योगांनी या क्लस्टरकरिता अँकर इंडस्ट्री म्हणून पुढाकार घ्यावा, असे आवाहनही सामंत यांनी केलेआहे. नाशिक इंडस्ट्रिज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या (निमा) वतीने आयोजित 'निमा पॉवर २०२३' प्रदर्शनाच्या उद्घाटनाप्रसंगी सामंत बोलत होते.

## गावठी पिस्टल, काडतूस बाळगणाऱ्या दोघांना अटक

सुराज्य/जळगाव : विना परवाना गावठी पिस्टल, काडतूस, तलवारी बाळगणाऱ्या दोघांना भुसावळ तालुक्यातील हतनूर येथून स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने अटक केली आहे. मयुर नारायण मोरे व कल्पेश राजू मोरे (रा. कंडारी, ता. भुसावळ, जि. जळगाव) असे अटक केलेल्यांचा नावे आहेत. मयुर मोरे हा घरात विनापरवाना पिस्टल, काडतूस, तलवारी बाळगून दहशत निर्माण करीत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली होते. त्यानुसार पोलिसांनी पाळत ठेवून ही कारवाई केली.

# दिल्लीवर कुणाचे नियंत्रण?

## केंद्र सरकारचा अध्यादेश; सर्वोच्च न्यायालयाला आव्हान?



सुराज्य/नवी दिल्ली

**राजधानी दिल्लीमधील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि नियुक्त्यांचे अधिकार कुणाकडे असणार? यावर २०१५ पासून दिल्ली राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्यात बेबनाव सुरू आहे. ११ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने प्रशासकीय अधिकार लोकांनी निवडून दिलेल्या राज्य सरकारला असल्याचा निकाल दिला होता. मात्र त्यानंतर आता पुन्हा एकदा केंद्र सरकारने एक नवा अध्यादेश काढून प्रशासकीय अधिकार पुन्हा एकदा नायब राज्यपाल यांच्याकडे असतील असे संकेत दिले आहेत. राजधानी दिल्लीत प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आणि बदल्यांचे अधिकार दिल्ली सरकारकडून पुन्हा काढून केंद्र सरकारने एक प्रकारे सर्वोच्च न्यायालयालाच आव्हान दिले असल्याचे बोलले जात आहे. केंद्र सरकारच्या अध्यादेशामुळे नक्कीच अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ज्याचा ऊहापोह काही दिवसांनी सर्वोच्च न्यायालयासमोर नक्कीच होईल.**

**केंद्र सरकारचा अध्यादेश काय आहे?**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी काल ट्वीट करून नायब राज्यपाल दिल्ली सरकारने पाठविलेल्या फाइलवर स्वाक्षरी करीत नसल्याची तक्रार बोलून दाखविली होती. नायब राज्यपाल सुप्रीम कोर्टाचे आदेश का पाळत नाहीत? दोन दिवसांपासून सेवा विभागाच्या सचिवांच्या नियुक्तीच्या फाइलवर अद्याप स्वाक्षऱ्या का झालेल्या नाहीत? केंद्र सरकार पुढच्या आठवड्यात अध्यादेश आणून सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाला बदलणार आहे का? केंद्र सरकार सर्वोच्च न्यायालयाचा निकाल धुडकावून लावण्याचे कटकारस्थान करीत आहे का? नायब राज्यपाल या अध्यादेशाची वाट पाहत आहेत का? त्यामुळेच ते फाइलवर स्वाक्षरी करीत नाहीत? असे अनेक प्रश्न केजरीवाल यांनी उपस्थित केले होते.

अरविंद केजरीवाल यांनी दुपारच्या दरम्यान वरील ट्वीट केले होते. त्यानंतर रात्रीच केंद्र सरकारकडून अध्यादेशाची घोषणा झाली. या नव्या अध्यादेशाद्वारे केंद्राने राष्ट्रीय राजधानी नागरी सेवा प्राधिकरण' (National Capital Civil Service uthority - NCCS) निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. या प्राधिकरणाचे प्रमुख दिल्लीचे मुख्यमंत्री असतील. तसेच त्यामध्ये मुख्य सचिव आणि गृह विभागाच्या प्रधान सचिवांचा समावेश असेल. या प्राधिकरणाच्या माध्यमातून नायब राज्यपालांकडे प्रशासकिय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आणि बदल्यांची फाइल पुढे देण्यात येईल.

महत्त्वाचे म्हणजे, हे प्राधिकरण बहुमताने निर्णय घेईल, तोच पुढे सरकवला जाईल. याचाच अर्थ दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचा निर्णय दोन सनदी अधिकारी नाकारू शकतात आणि त्याविरोधात आपले मत मांडू शकतात. तसेच प्राधिकरणाने घेतलेला एखादा निर्णय राज्यपाल नाकारू शकतात आणि त्यावर पुनर्विचार करण्यासाठी पुन्हा तो प्राधिकरणाकडे पाठवू शकतात.

जर नायब राज्यपाल आणि प्राधिकरण यांच्यात एखाद्या निर्णयावरून मतभेद कायम राहिले तर नायब राज्यपाल यांचा निर्णय अंतिम राहील, अशी तरतूद या नव्या अध्यादेशात करण्यात आली आहे. मागच्याच आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली सरकारला जे अधिकार दिले, त्याच्या अतिशय उलट असा हा अध्यादेश आहे.

**सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला बगल देता येते?**

कायदेमंडळाद्वारे सर्वोच्च न्यायालयाचा निकाल बदलण्याची शक्ती संसदेकडे आहे. मात्र, संसदेने केलेला कायदा आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निकालात विरोधाभास असता कामा नये, असे संकेत आहेत. याचा अर्थ सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाविरोधात संसदेला कायदा आणता येऊ शकतो.

## चुकीला माफी नाही कोर्टाने शिक्षा ठोठावली



सुराज्य/नवी दिल्ली

मुंबई सत्र न्यायालयानं शुक्रवारी एका बलात्काराच्या प्रयत्नाच्या प्रकरणात आरोपीला दोषी ठरवत साडेतीन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. आरोपीनं २०१७ मध्ये त्याच्या गर्लफ्रेंडवर बलात्काराचा प्रयत्न केला होता. आरोपी सध्या जामिनावर बाहेर असून विशेष बाब म्हणजे सुनावणी सुरु असताना तक्रारदार महिलेशी त्यानं विवाह केला असून दोघांना एक अपत्य देखील आहे.

न्यायाधीश ए. बी. शर्मा यांनी आरोपीकडून करण्यात आलेल्या युक्तिवादावर भाष्य केलं. आरोपीकडून त्यानं संबंधित महिलेसोबत लग्न केलं असं ते पुरेसं नसल्याचं म्हटलं आहे. ही बाब पुरावे नाकारण्यासाठी पुरेशी नसल्याचं म्हटलं. आरोपी आणि तक्रारदारानं लग्न केलं असलं तरी आणि त्यांना एक अपत्य असलं तरी आरोपीला सोडता येणार नसल्याचं ए. बी. शर्मा यांनी म्हटलं.

न्याय होण्यासाठी किमान शिक्षा करणं गरजेचं असल्याचं न्यायाधीशांनी सांगितलं. तक्रारदार महिला आणि आरोपीनं लग्न केल्याचं लक्षात घेता न्यायाधीशांनी टिप्पणी केली. गुन्ह्याची तीव्रता लक्षात घेऊनचं शिक्षा सुनावण्यात आल्याचं न्यायाधीशांनी म्हटलं. आरोपीचं जुनं काही रेकॉर्ड नसून त्याचं वय ३१ वर्ष असल्यानं या प्रकरणी कमाल शिक्षेची गरज नसल्याचं न्यायाधीशांनी सांगितलं.

सत्र न्यायालयानं आरोपीला शिक्षा सुनावली तेव्हा २०१७ मधील तक्रारदार आणि सध्याची त्याची पत्नी आणि अपत्य देखील सुनावणीसाठी हजर होतं. कोर्टानं साडेतीन वर्षांची शिक्षा सुनावल्यानंतर तिला रडू कोसळलं. पतीच कुटुंबातील कमावणारी व्यक्ती असल्याचं ती म्हणाले.

कोर्टानं आरोपीला ५ हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा देखील सुनावलेली आहे.

## दगडूशेठ गणपती मंदिराला पर्यटनस्थळाचा दर्जा

पुणे : देशातील अनेक गणेशभक्त पुण्यातील दगडूशेठ गणपतीच्या दर्शनासाठी येतात. या गणेशभक्तांसाठी आणि खास करून पुण्यातील गणेशभक्तांसाठी एक आनंदाची बातमी आहे. दगडूशेठ गणपती मंदिराला आता पर्याटन स्थळाचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबद्दल माहिती पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी ट्विटरच्या माध्यमातून दिली आहे.

दगडूशेठ मंदिर अनेक गणेश भक्तांचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे महाराष्ट्रातीलच नाहीतर देशभरातील गणेशभक्त एकदा तरी या मंदिरात दर्शनासाठी येतात. त्यामुळे पुण्याचे पालकमंत्री चंद्राकांत पाटील यांनी दगडूशेठ गणपती मंदिराला पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याची घोषणा केली आहे.

## क्रिकेट जगतावर पसरली शोककळा, ऑस्ट्रेलियाच्या माजी कर्णधाराचे निधन

सुराज्य/नवी दिल्ली



ऑस्ट्रेलियाचा माजी कसोटीपटू आणि हॉकी ऑलिम्पियन ब्रायन बूथ यांचे ८९ व्या वर्षी निधन झाले. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने शनिवारी ही माहिती दिली. बूथने ऑस्ट्रेलियासाठी २९ कसोटी सामने खेळले, त्यापैकी दोन सामन्यांमध्ये तो कर्णधारही होता. त्याने आपल्या कसोटी कारकिर्दीत पाच शतके झळकावली. १९६० च्या सुरुवातीच्या काळात ते ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाचे महत्त्वाचे सदस्य होते.

त्याने कसोटी क्रिकेटमध्ये ४२.२१ च्या सरासरीने १७७३ धावा केल्या. यासोबतच बूथने १९५६ मध्ये मेलबर्न येथे खेळल्या गेलेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत ऑस्ट्रेलियन हॉकी संघाचे प्रतिनिधित्व केले होते. त्यांच्या मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट आहे.

**हॉकीमध्येही मोठी ख्याती**

बूथ या मधल्या फळीतील फलंदाजाने १९६२ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या कसोटी पदार्पणात शतक झळकावले होते. यानंतर मेलबर्नमध्ये खेळल्या गेलेल्या पुढील कसोटी सामन्यातही त्याने शतक झळकावले.

**पुण्यात छोट्या उद्योजकांची बँक**

पुणे शहरात कर्जपुरवठा करणाऱ्या शेकडो बँका आणि वित्तपुरवठा करणाऱ्या संस्था कार्यरत असताना पुण, पिंपरी-चिंचवड परिसरातील ९२ टक्के व्यावसायिक भांडवलासाठी अद्यापही नातेवाइक, बचत आणि आप्तेष्टांकडून उसनवारीवर घेण्यात येणाऱ्या पैशांवर अवलंबून असल्याचे सर्वे क्षणातून स्पष्ट झाले आहे.

## कृषिपंपांना सौरऊर्जेचे बळ




सुराज्य/मुंबई : शेतीला दिवसा पाणी देता यावे, यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणामार्फत (महाऊर्जा) पंतप्रधान कुसूम सौर योजनेतून शेतकऱ्यांना सौरकृषिपंपांचे वाटप करण्यात येते. त्यासाठी अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, त्याअंतर्गत २५ हजार सौर कृषिपंपांचे वाटप केले जाणार आहे.

या योजनेअंतर्गत राज्यात आतापर्यंत ५६ हजार सौर कृषीपंप बसविण्यात आले असून, त्यामध्ये पुणे जिल्हा आघाडीवर आहे. आणखी २० हजार सौर कृषीपंप बसविण्याची प्रक्रिया सुरू आहे. केंद्र सरकारच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने राज्यात एक लाख सौर कृषीपंप बसविण्याचे उद्दिष्ट दिले आहे. त्यामुळे उर्वरित २५ हजार सौर कृषीपंप बसविण्यासाठी अर्ज प्रक्रिया सुरु झाली असून, शेतकऱ्यांनी महाऊर्जाच्या ऑनलाइन संकेतस्थळावर अर्ज करावे, असे आवाहन 'महाऊर्जा'ने केले आहे.

## शपथविधी सोहळ्याला ठाकरे, बॅनर्जींची अनुपस्थिती

सुराज्य/मुंबई

कर्नाटकचे मुख्यमंत्री म्हणून शनिवारी सिद्धरामय्यांनी शपथ घेतली तर उपमुख्यमंत्री म्हणून डी. के. शिवकुमार यांनी शपथ घेतली. हा शपथविधी सोहळा काही वेळापूर्वीच पार पडला. या शपथविधी सोहळ्याला १९ विरोधी पक्षांना बोलवण्यात आलं होतं. मात्र पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे या दोघांचीही या सोहळ्याला अनुपस्थिती होती.

सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार यांचा शपथविधी सोहळा पार पडला. या



शपथविधी सोहळ्यासाठी ममता बॅनर्जींनाही निमंत्रण दिलं गेलं होतं. काही दिवसांपूर्वीच ममता बॅनर्जी असं म्हणाल्या होत्या की, 'काँग्रेस आणि भाजपा यांना मी सारख्याच अंतरावर ठेवू इच्छिते. तरीही ममता बॅनर्जींना या सोहळ्याला निमंत्रण दिलं गेलं होतं.

मात्र, ममता बॅनर्जी या शपथविधी सोहळ्याला आल्या नाहीत. तसंच काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी यांनी उद्धव ठाकरेंना फोन करुन शपथविधी सोहळ्याचं निमंत्रण दिलं होतं.

मात्र, उद्धव ठाकरेही या शपथविधी सोहळ्याला अनुपस्थित होते. या सोहळ्याला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह प्रमुख विरोधी पक्षांच्या नेत्यांची उपस्थिती होती. उद्धव ठाकरे हे या सोहळ्याला अनुपस्थित का राहिले? हे अद्याप समजू शकलेलं नाही.

धक्कादायक

## सामूहिक बलात्काराच्या घटनेने बीड शहर हादरले, सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल

सुराज्य/बीड

रिक्षात विसरलेली पर्स परत करण्याच्या बहाण्याने एका २४ वर्षीय विधवा महिलेच्या घरात घुसून एका ऑटोरिक्षा चालकाने तिच्यावर अत्याचार केला. दरम्यान या कृत्याची चित्रफित समाजमाध्यमातून प्रसारित करण्याची धमकी देऊन वारंवार तिच्यावर ऑटोरिक्षा चालकांसह इतर सात जणांकडूनही अत्याचार करण्यात आले. ही घटना बीड शहरात वेगवेगळ्या भागात २०१४ ते ते २०२१ या वर्षात घडली. या प्रकरणी पीडित महिलेच्या फिर्यादीवरून माजलगाव पोलिसात सात जणांवर १८ मे २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बारावीच्या परीक्षेत मोठा घोटाळा


**चौकशी समितीच्या अहवालाने खळबळ**

सुराज्य/पुणे

**बारावीच्या परीक्षा संदर्भातील पेपर तपासणीमध्ये घडलेल्या एका घटनेमुळे शिक्षण विभागात मात्र खळबळ उडाली आहे. भौतिकशास्त्राच्या ३७२ उत्तरपत्रिकांमध्ये एकाच व्यक्तीचे हस्ताक्षर असल्याची माहिती उघडकीस आलेली आहे.**

यंदाच्या वर्षीची बारावीची परीक्षा ही अनेक कारणांमुळे चर्चेचा विषय ठरली. बारावीच्या पेपरफुटीमुळे देखील राज्यभरात बारावीच्या परीक्षांची चर्चा करण्यात आली. परंतु आता बारावीच्याच परीक्षा संदर्भातील पेपर तपासणीमध्ये घडलेल्या एका घटनेमुळे शिक्षण विभागात मात्र खळबळ उडाली आहे. बारावीच्या भौतिकशास्त्र पेपर तपासणीमध्ये तब्बल ३०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिकेमध्ये दोन हस्ताक्षर आढळून आलेली होती. त्यामुळे या घटनेच्या चौकशीसाठी चौकशी समिती नेमण्यात आली. परंतु या चौकशी समितीच्या अहवालातून आलेल्या माहितीमुळे आता धक्का बसलेला आहे. कारण चौकशी समितीने दिलेल्या अहवालानुसार भौतिकशास्त्राच्या ३७२ उत्तरपत्रिकांमध्ये एकाच व्यक्तीचे हस्ताक्षर असल्याची माहिती उघडकीस आलेली आहे. त्यामुळे आता याबाबत राज्य शिक्षण मंडळाला कळविण्यात आले असून हा बारावीच्या परीक्षांमधील आत्तापर्यंतचा सर्वात मोठा घोटाळा समजला जात आहे.

बारावीच्या उत्तर पत्रिका तपासात घेतलेल्या असतानाच यातील तीनशेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिकेमध्ये दोन वेगवेगळे हस्ताक्षर असल्याची बाब उघडकीस आलेली होती. हे प्रकरण संशयास्पद असल्याने याबाबतची माहिती



शिक्षण मंडळाला देण्यात आली. त्यानंतर शिक्षण मंडळाने या सर्व विद्यार्थ्यांची यादी तयार करून त्यांना नोटिसा पाठवल्या आणि त्यानंतर त्यांना चौकशीसाठी देखील बोलावण्यात आले.

विद्यार्थ्यांसोबतच केंद्रप्रमुख यांची देखील या प्रकरणी चौकशी करण्यात आली होती. पण दोन हस्ताक्षर कोणाचे आहेत? हे स्पष्ट होऊ न शकल्याने याबाबत चौकशी समिती नेमण्यात आली. परंतु आता चौकशी समितीने दिलेल्या अहवालामुळे एकच खळबळ उडालेली आहे. कारण भौतिकशास्त्राच्या तीनशेपेक्षा अधिक म्हणजे तब्बल ३७२ उत्तर पत्रिकांमध्ये एकाच व्यक्तीचे हस्ताक्षर असल्याचे समोर आलेले आहे.

हा सर्व प्रकार समोर आल्यावर १५ मे पासून परीक्षा केंद्र संचालकांची सुनावणी घेण्यात येऊ लागली. हा प्रकार कुठे झाला. उत्तरपत्रिका जमा कधी केल्या, त्या कस्टडियनकडे कधी पाठवल्या, अशी केंद्र संचालकांवर प्रश्नांची सरबत्ती करण्यात आली होती. त्यानंतर पर्यवेक्षक, कस्टडियनचीदेखील सुनावणी घेण्यात आली. आता मॉडरेटरची सुनावणी घेतल्यानंतर हा प्रकार कसा व कुठे घडला, या निष्कर्षापर्यंत पोहोचता येईल. आताच उत्तरपत्रिका लिहिण्यासाठी बाहेर दिल्या होत्या की, सेंटरमध्येच ते मॅनेज केले होते, असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित करण्यात येत आहेत.

तर, हा प्रकार बीड आणि हिंगोली या दोनच जिल्ह्यात कसा घडला आहे? भौतिकशास्त्राच्या ३७२ उत्तरपत्रिकांमध्ये एकसारखेच हस्ताक्षर कसे काय आले?, यासाठी संबंधित सेंटरच मॅनेज झाले होते की, उत्तरपत्रिकाच बाहेर देण्यात आल्या होत्या?, परीक्षा झाल्यावर या प्रश्न पत्रिकेतील उत्तरे लिहिण्यात आली का?, प्रथमदर्शनी उत्तरपत्रिकांमध्ये अर्धवट राहिलेली उत्तरे एकाच व्यक्तीने लिहिलेली असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे ती व्यक्ती कोण? अशा प्रश्नांची आता राज्य शिक्षण मंडळकाडून आणि चौकशी समितीकडून तपास करण्यात येत आहे.

# खरंच 'ब्लॅक मनी'ला पुन्हा पाय फुटणार काय?






''भारतीय रिझर्व्ह बँक अर्थात आरबीआयने दोन हजारच्या नोटांवर बॅन आणल्यानंतर देशाची अर्थव्यवस्था आणि बँकिंग क्षेत्र हादरून गेले. ही पुन्हा नोटबंदी का आणली? असा प्रश्न कित्येकांच्या मनात निर्माण झाला.आपले काम पुन्हा वाढले ही चिंता बँक अधिकारी आणि कर्मचारी यांना लागून राहिली. यासंदर्भात बँकिंग क्षेत्राचा कानोसा घेतला असता त्यांनी ही नोटबंदी नव्हे,अशा स्पष्ट शब्दात स्पष्टीकरण दिले. गेल्या सात महिन्यात दोन हजार नोटांचा वापर बाजारात कमी होत गेला. त्यावर संशोधन केल्यानंतर एक धक्कादायक माहिती आरबीआयला मिळाली. देशातील धनदांडग्यांनी, बड्या व्यावसायिकांनी, दोन नंबर धंदेवाल्यांनी,वाळू-मद्य माफिया यांनी या नोटांचा साठा करून ठेवला आहे. त्यात ब्लॅक मनीसुद्धा असू शकतो. २६ नोव्हेंबर रोजी, भाजपा आमदार पी. विष्णू कुमार राजू यांनी याविषयाला हात घातला आणि आरबीआयचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्याकडे पत्र धाडून एक मागणी केली. टप्प्याटप्प्याने बाजारातून २००० आणि ५०० च्या नोटा काढून घेण्यात याव्यात,असे राजू म्हणाले होते. राजू त्यांनी गव्हर्नर यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले की, दारूमाफिया, वाळूमाफिया आणि रिअल इस्टेट माफियांनी पुन्हा एकदा काळा बाजार सुरू केला असून दोन हजार नोटांचा प्रचंड साठा त्यांच्याकडे आहे,असे सांगितले होते. बँकिंग क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी देखील हाच संयश व्यक्त केला आहे. आरबीआयच्या निर्णयामुळे काळा पैसा बुडेल, असे काहीच घडणार नाही. ज्यांच्याकडे असा काळा पैसा आहे, ते लोक पुन्हा आपला पैसा दुसऱ्या चलनात गुंतवतील,असेही बँकिंग क्षेत्र म्हणते. आता ज्यांच्याकडे साठा आहे, ते लोक आपल्या सग्यासोयऱ्यांच्या नावे हा पैसा ठेवतात का? हाही प्रश्न पुढे आला आहे कारण सरकारने उत्पन्नाची जी मर्यादा ठेवली आहे, त्याच्यापेक्षाही जास्त नोटा आढळल्या तर त्यांच्यावर टीडीएस हा टॅक्स बसतो. त्याचा फाटा मारण्याचा उद्योग दोन हजार नोटांची साठेबाजी करणाऱ्यांकडून होवू शकतो.तेव्हा आरबीआयच्या निर्णयातून 'ब्लॅक मनी'ला खरेच पाय फुटणार काय? याचे उत्तर सर्वसामान्यांना अपेक्षित आहे''







## नोट चलनातून बाद; आता पुढे काय?

दोन हजार रुपयांच्या नोटा चलनातून काढून घेण्याचा आपल्यावरील परिणाम काय, यासह तुमच्या मनातील अनेक प्रश्नांना विचारवंतांनी उत्तरे दिली आहेत.२ हजारांच्या नोटा वितरणातून काढल्या, 'या' तारखेपर्यंत नोटा बदलून घेता येणार. तुमच्याकडे असलेल्या दोन हजाराच्या नोटेचे करायचे काय? ज्या नागरिकांकडे दोन हजार रुपयांच्या नोटा आहेत त्यांनी त्या ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत बँकेत जमा करून त्या बदल्यात अन्य नोटा मिळवता येणार आहेत. नोटाबदलाची ही प्रक्रिया मंगळवार, २३ मेपासून सुरू होईल.

## नोटा कुठे बदलून मिळतील?

आरबीआयने सांगितले की, २००० रुपयांची नोट कोणत्याही बँकेत बदलता येते. म्हणजेच जर तुमचे खाते स्टेट ऑफ इंडियामध्ये असेल आणि तुमच्या घराजवळ पंजाब नॅशनल बँक असेल, तर तुम्ही तिथेही जाऊन नोट बदलून घेऊ शकता. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास नोटा बदलून घेण्यासाठी कोणत्याही विशिष्ट बँकेत जाण्याची गरज नाही. कोणत्याही बँकेला भेट देऊन या बदलून घेतल्या जाऊ शकतात.

## दोन हजार रुपयांची नोट आणलीच का?

रिझर्व्ह बँकेच्या म्हणण्यानुसार, नोव्हेंबर २०१६ मध्ये सरकारने १,००० रुपये आणि ५०० रुपये मूल्याच्या नोटांच्या निश्चलनीकरणाचा निर्णय अकस्मात घेऊन, तब्बल ८६ टक्के नोटा चलनातून बाद ठरविल्या. अशा वेळी नागरिकांना कमी वेळेत जास्तीत जास्त मूल्याच्या चलनी नोटा उपलब्ध व्हाव्यात या हेतूने २,००० रुपयांची नवीन नोट त्यावेळी सर्वप्रथम चलनात आणली गेली. शिवाय इतर मूल्यांच्या नोटा चलनात प्रमाणात उपलब्ध झाल्यानंतर २०१८-१९ पासून २,००० रुपयांच्या नोटांची छपाई रिझर्व्ह बँकेने बंद केली होती.

## 'स्वच्छ नोट धोरण' काय?

रिझर्व्ह बँकेच्या 'स्वच्छ नोट धोरणा'च्या अनुषंगाने, २००० रुपये मूल्याच्या नोटा चलनातून काढून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र २,००० रुपये मूल्याच्या नोटेला कायदेशीर मान्यता कायम असेल, असेही पत्रकात म्हटले आहे. तथापि या नोटा चलनातून काढून घेण्याच्या निर्णयामुळे सर्व बँकांना येत्या ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत नागरिकांकडून २,००० रुपये मूल्याच्या नोटा स्वीकारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बँकेत या नोटा जमा करून इतर मूल्याच्या नोटा लोकांना मिळवता येतील. शिवाय रिझर्व्ह बँकेच्या १९ प्रादेशिक शाखांमध्येही नोटाबदलाची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.



## चलनातील प्रमाण किती?

केंद्र सरकारने नोव्हेंबर २०१६ मध्ये १,००० रुपये आणि ५०० रुपये मूल्याच्या नोटा चलनातून बाद करत २,००० रुपये मूल्याची नवीन नोट चलनात आणली होती. त्यावेळी २,००० रुपये मूल्याच्या नोटेचे चलनातील प्रमाण ८९ टक्के होते. चलनात असलेल्या २,००० च्या एकूण नोटांचे मूल्य ३१ मार्च २०१८ रोजी ६.७३ लाख कोटी रुपये होते. मात्र या उच्चांकी पातळीवरून कमी होत ते ३१ मार्च २०२३ पर्यंत ३.६२ लाख कोटींपर्यंत कमी झाले. म्हणजेच चलनातील २,००० रुपये मूल्याच्या नोटांचे प्रमाण ३७.३ टक्क्यांवरून १०.८ टक्क्यांपर्यंत कमी होत आले.



रिझर्व्ह बँकेने २ हजारच्या नोटांवर बॅन आणल्यानंतर घरात लपवलेलया २ हजार नोटांच्या बंडला बाहेर काढायला सुरुवात झाली आहे. शनिवारी एका घरात टायरमध्ये लपवून ठेवलेल्या नोटांचे बंडल बाहेर काढत असतानाचा व्हिडीओ व्हायरला झाला आहे.

### नोटा अडणचीच्या होत्या...



रिझर्व्ह बँकेने रुपये दोन हजारच्या नोटा चलनातून काढून घेण्याचा निर्णय जाहीर केला. वास्तविक याचा मागील पाचशे व एक हजार नोटबंदी सारखे कोणतेच परिणाम आता होणार नाहीत. मागील नोटबंदीत नोटा भरणे किंवा खात्यात जमा करणे यासाठी मर्यादा होती. आता दोन हजाराच्या नोटा बँकेत स्वतःच्या खात्यात भरण्यासाठी कोणतेच बंधन नाही.फक्त नोटा बदलण्यासाठी एका वेळी १० नोटा म्हणजेच २० हजाराची मर्यादा आहे. यामुळे काळा पैसा बुडेल, असे काहीच घडणार नाही. ज्यांच्याकडे असा काळा पैसा आहे, ते लोक पुन्हा आपला पैसा दुसऱ्या चलनात गुंतविणार आहेत. मुळात दोन हजारांच्या नोटा या चलनात अडचणीच्याच होत्या. त्यांचा जास्त कोणी वापर करतच नव्हते. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना तर याची काहीच झळ बसणार नाही.आता पुन्हा पाचशे रुपयाच्या नोटा चलनात असल्यामुळे मोठे व्यवहार करण्यात अडचणीही येणार नाहीत, असे वाटते. सध्या तरी या नोटा बदलण्यासाठी भरपूर कालावधी असल्याने जे श्रीमंत लोक याचा साठा करुन ठेवला आहे, त्यांना मागील नोटबंदी मध्ये जसे इतर लोकांची खाती काढून पैसे जमा करण्याचे प्रसंग घडले, तसे आता होईलच अशी शक्यता नाही. काही लोक याला येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकांचे संबंध लावत आहेत पण तसे काही असेल असे वाटत नाही.कारण रिझर्व्ह बँकेने हा निर्णय घेतला आहे.

**-विश्वनाथ आमणे, निवृत्त बँक अधिकारी**




### टाळाटाळची शक्यता...

तुमच्याकडे २००० रुपयांच्या नोटा असतील तर तुम्हाला घाबरण्याची गरज नाही. तुम्ही तुमच्या सोयीनुसार त्या बदलून घेऊ शकता, यासाठी आरबीआयने पुरेसा वेळ दिला आहे.२००० रुपयांची नोट पूर्णपणे कायदेशीर आहे. ती आता सिस्टममध्येही चालणार आहे. पण आता सामान्य व्यक्तीसुद्धा २ हजार रुपयांच्या नोटेने व्यवहार करण्यास टाळाटाळ करण्याची शक्यता आहे. कारण ती नोट आता बदलून घ्यावी लागणार आहे. त्यामुळे ती नोट बदलण्याचा त्रास टाळण्यासाठी दुकानदार ती घेणे टाळू शकतात.

### हीसुद्धा नोटाबंदी आहे का?

नाही. ही नोटाबंदी अजिबात नाही. २००० रुपयांच्या नोटा पूर्णपणे वैध राहतील. त्या अद्याप बंद केल्या गेल्या नाहीत. फक्त त्या सिस्टममधून काढून घेण्यासाठी वेळ दिला जात आहे. ज्या उद्देशासाठी त्या छापल्या होत्या, तो आता पूर्ण झाला आहे, असे आरबीआयला वाटते.

### साठेबाजीसाठी नोटांचा वापर...



प्रत्यक्षात काळ्या पैशाच्या साठेबाजीसाठी २,००० च्या नोटांचा वापर वाढत गेल्याचे आणि त्या सामान्य चलनांतून गायब झाल्याचे आढळून आल्याने, निश्चलनीकरणानंतर ही अधिक मूल्य असलेली नोट वाढीव प्रमाणात आणलीच कशाला, असे प्रश्न उपस्थित केले गेले. आता ही नोट चलनातून बाद करण्याचा निर्णय घेऊन, आधी ती चलनात आणण्याचा निर्णय चुकीचा होता, याची रिझर्व्ह बँकेने कबुलीच दिली, अशी प्रतिक्रिया राज्य बँक कर्मचारी फेडरेशनचे महासचिव देवीदास तुळजापूरकर दिली.

### ११८ कोटी पडून...

मागीलवेळी नोटबंदी झाल्यावर काही काळ त्या सहकारी बँकेत भरण्याचीही मुभा होती. त्यावेळी मोठ्या प्रमाणावर जुन्या नोटा सहकारी बँकांत जमा झाल्या. मात्र, यात गैरप्रकार होत असल्याचा संशय आल्यावर सरकारने नियम बदलत सहकारी बँकांकडील हे अधिकार काढून घेतले. एवढेच नव्हे तर विशिष्ट काळानंतर त्यांच्याकडे जमा झालेल्या नोटा आरबीआयने स्वीकारणे टाळले. त्यामुळे सहा वर्षांनंतरही सुमारे ११८ कोटी रुपयांच्या जुन्या नोटा महाराष्ट्रातील जिल्हा सहकारी बँकात आजही पडून आहेत.

### हा निर्णय का घेतला?

नोटाबंदीनंतर चलनात आणलेली २ हजार रुपयांची नोट जवळपास ७ वर्षांनंतर चलनातून माघारी घेण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेने का घेतला, याविषयी आता चर्चा होत आहे. देशभरातील बँकांनी २ हजार रुपयांच्या नोटा ग्राहकांना देणे तातडीने थांबवावे, असेही आदेश रिझर्व्ह बँकेने दिले आहेत. मात्र २०१६ साली ५०० रुपये आणि १ हजार रुपयांच्या नोटा बंद केल्यानंतर चलनात आणलेली २ हजार रुपयांची नोट आता जवळपास सात वर्षांनंतर चलनातून माघारी घेण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेने का घेतला, याविषयी आता देशातील नागरिकांमध्ये कुतूहल निर्माण झाले आहे. आरबीआयने हा निर्णय घेताना त्यामागील कारणांचाही थोडक्यात उल्लेख केला आहे.

### क्लीन नोट पॉलिसी म्हणजे काय?

भारतीय रिझर्व्ह बँकेने २००० रुपयांच्या नोटा चलनातून काढून घेण्याचा निर्णय घेतला आणि ते केंद्रीय बँकेच्या स्वच्छ नोट धोरणांतर्गत करण्यात आल्याचे सांगितले.आता पण प्रश्न असा येतो की- आरबीआयला २००० रुपयांची नोट चलनातून काढून घेण्याची गरज का पडली? क्लीन नोट पॉलिसी म्हणजे काय? आरबीआय क्लीन नोट पॉलिसी अंतर्गत २००० रुपयांच्या नोटा काढून घेत आहे. दोन हजार रुपयांच्या नोटांचे वय ४ ते ५ वर्षे असणार होते, त्यामुळे आरबीआय या नोटा मागे घेत आहे. तसेच सर्वसामान्यांमध्ये ही नोट फारशी चलनात नाही. याशिवाय उर्वरित रकमेच्या चलनी नोटा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. अशा २००० रुपयांच्या नोटा बाद करण्याची घोषणा करण्यात आली आहे.

### नोटेची छपाई बंद


रिझर्व्ह बँकेने २००० रुपयांच्या नोटा चलनातून बाद करण्याचा निर्णय घेतला असून आरबीआय कायदा १९३४ च्या कलम २४(१) अंतर्गत नोव्हेंबर २०१६ मध्ये ५०० आणि २००० रुपयांच्या नोटा चलनात आल्या होत्या. पण केंद्रीय बँकेने २०१८-१९ पासून दोन हजार रुपयांच्या नोटांची छपाई थांबवली होती. आता क्लीन नोट धोरणांतर्गत ती मागे घेण्याची घोषणा करण्यात आली आहे.

### बँकेत खाते आवश्यक आहे का?

कोणत्याही बँकेच्या शाखेत जाऊन दोन हजारांची नोट बदलून इतर कमी मूल्याच्या नोटा मिळवता येतील. त्यासाठी त्याच बँकेत खाते असणे आवश्यक नाही. मात्र, अशावेळी केवळ २०,००० रुपयांच्या मर्यादेपर्यंत दोन हजार रुपयांच्या नोटा बदलता येतील.




## नकार दिला तर काय कराल?



बँकांमध्ये २३ मे २०२३ पासून ते ३० सप्टेंबरपर्यंत २००० रुपयांच्या नोटा बदलून देण्याचे काम सुरू राहणार आहे. कोणतीही गैरसोय टाळण्यासाठी बँकेच्या कामकाजाच्या वेळेत या नोटा कधीही बदलून घेता येतील. परंतु, विविध कारणांमुळे बँका नोटा बदलून देण्यास नकार देऊ शकते. अशी परिस्थिती निर्माण झाल्यास काय करायचे? असा प्रश्न पुढे आला आहे. तुमच्याकडील दोन हजारच्या नोटा तुम्ही बँकेत बदलायला गेल्यास बँक तुम्हाला नकार देऊ शकते. अशावेळी सर्वांत प्रथम संबंधित बँकेत तक्रार दाखल करावी. बँकेत तक्रार दाखल केल्यानंतर ३० दिवसांनीही बँकेने तुमच्या तक्रारीची दखल घेतली नाही तर Reserve Bank - Integrated Ombudsman Scheme (RB-IOS), २०२१ याअंतर्गत तक्रारदार तक्रार दाखल करू शकते. cms.rbi.org.in. या संकेतस्थळावर जाऊन तुम्ही तक्रार दाखल करू शकता.

### काय म्हणाले फडणवीस?



दोन हजारची नोट ही वितरणातून बाहेर काढण्याचा निर्णय झाला आहे. ही नोट काही बेकायदेशीर ठरवलेली नाही. ऑक्टोबरपर्यंत वितरणातून ही नोट बाहेर काढायची आहे. ऑक्टोबरपर्यंत तुम्हाला या नोटा बदलता येईल. ज्यांच्याकडे कायदेशीर नोटा असतील, ज्यांच्याकडे पांढरा पैसा असेल अशा कुणालाही चिंता करण्याची गरज नाही. कुणी काळा पैसा जर जमा करुन ठेवला असेल तर त्याला बदलताना त्रास नक्कीच होणार आहे. कारण त्याला सांगावं लागणार आहे की इतक्या नोटा आल्या कुठून? दोन हजारांच्या नोटा किंवा अशा नोटा बदलल्यानंतर त्याचा सगळ्यात मोठा फायदा, जो मागच्या वेळीही नोटबंदीनंतर झाला होता. जे बनावट चलन पुश करण्याचा प्रयत्न आयएसआयकडून होतो तो हाणून पाडला जातो. एकीकडे जो फेक करन्सी पुश करण्याचा प्रयत्न आहे तो या निर्णयामुळे त्यावर आळा बसेल. ज्यांनी नोटा जमा करुन ठेवल्या असतील त्यांना आता तपशील द्यावा लागेल,असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**संकलन व संपादन : पुरुषोत्तम कुलकर्णी**